CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | सोमवार, दि.१६ जानेवारी २०२३ | ▶ वर्ष : २१ वे ▶ अंक : १११ वा किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

## श्रीलंकेवर ओढवली संक्रांत, लंकादहन करत रोहित सेनेने चाहत्यांचे केले तोंड गोड

✔ **तिरवनंतपुरम** : रविवारी श्रीलंकेवरच संक्रात आल्याचे पाहायला मिळाले. श्रीलंकेचे पतंग कापत भारताने आपल्या चाहत्यांचे तोंड गोड केले आणि मकर संक्रांतीच्या दिवशी आनंदाची बातमी दिली. भारताने तिसऱ्या विजयासह या मालिकेत लंकादहन केले आणि ही सीरिज ३-० अशी खिशात टाकली. विराट कोहली आणि शुभमन गिल यांनी यावेळी दमदार शतके लगावली. त्याचबरोबर मोहम्मद सिराजने भेदक गोलंदाजी करत चार बळी मिळवले. भारताने ३१७ धावांनी यावेळी दणदणीत विजय मिळवला.

मोहम्मज सिराजने यावेळी श्रीलंकेच्या फलंदाजांना सळो की पळो करून सोडले. एकामागून एक सिराजने श्रीलंकेला चार धक्के दिले आणि त्यांचे कंबरडे मोडले. तत्पूर्वी, शुभनल गिल आणि विराट कोहली यांनी धडाकेबाज शतके झळकावली. त्यामुळेच भारताला ३९० धावांचा डोंगर उभारता आला. कोहलीने अखेपर्यंत किल्ला लढवला. कोहलीचे हे वनडेमधील ४६ वे शतक ठरले. त्याचबरोबर कोहलीने यावेळी सचिन तेंडुलकरचा मायदेशातील २० वनडे शतकांचा विक्रम मोडीत काढला. कोहलीने यावेळी ११० चेंडूत १३ चौकार आणि आठ षटकारांच्या जोरावर नाबाद १६६ धावांची खेळी साकारली. अखेरच्या काही षटकांत लोकेश राहुल आणि सूर्यकुमार यादव मोठे फटके मारण्याच्या नादात बाद झाले. त्यामुळेच भारताला ४०० धावांचा पल्ला गाठता आला नाही. श्रीलंकेचा हा इतिहासात मोठा पराभव ठरला.


# विठुरायाच्या दरबारात फुलला धन-धान्यांचा मळा
# अनोखा शृंगार पाहून भाविक तृप्त झाला



✔ सुराज्य/पंढरपूर

**पंढरीचा राजा श्रीविठुराया एरव्ही वैष्णवांच्या मांदियाळीत आणि टाळ-मृदंगाच्या नादब्रह्यात तल्लीन असतो. मात्र वर्षातून एक दिवस हा सावळ्या धन-धान्य व फळ-फळावळांच्या मळ्यात दंग होवून जातो, तो दिवस म्हणजे मकरसंक्रांतीचा. या दिनाचे आचित्य साधून रविवारी श्रीविठ्ठलाचा गाभारा रंगीबेरंगी फुलांबरोबरच फळ-फळावळांसह विविध भाज्यांनी सजवण्यात आला होता. श्रीपांडुरंगाच्या चरणी भक्तांची ही जशी सेवा अपर्ण केली जाते, तशी रूक्मिणी मातेच्या भाळी असंख्य सुवासिनींकडून वाणवसाचा साज चढवला जातो. 'कांदा-मुळा भाजी, अवघी विठाई माझी'अशा शब्दात सोलापूरच्या भूमीतील संत सावता माळी यांनी श्रीविठुरायाच्या चरणी आपली भक्ती अर्पण केली होती. त्या सजावटीचा शृंगार पाहून असंख्य भक्तांना त्याचा अनुभव आला. हे विलोभनीय दृश्य पाहून भाविकांच्या डोळ्याचे पारणेही फिटले.**





मकरसंक्रांतीच्या वेळी खरीपाचे धान्य येते तर रब्बी हंगामातील पिकांची जोमदार उगवण होते. बागायतीमुळे आपल्या जिल्ह्यात बारा महिने फळांचे व भाज्यांचे उत्पादन होत असते. धान्य व भाज्यांच्या रूपाने आपल्या घरात आलेली 'लक्ष्मी' विठ्ठल-रूक्मिणीच्या चरणी अपर्ण करण्याची परंपरा आहे. त्यानुसार रविवारी असंख्य भाविक पंढरपूरला आले होते. त्यात महिला भाविकांची लक्षणीय उपस्थिती होती.

याच दिवशी रुक्मिणी मातेस वाणवसा सोहळ्यानिमित्त नवीन धान्य अर्पण केले जाते. त्यासाठी राज्यभरातून महिला भाविक पंढरीत आल्या होत्या.

या दिवशी भोगी करण्याची रितही आहे. रविवारी भल्या पहाटेपासून मंदिर परिसर महिलांच्या गर्दीने फुलून गेला होता. संक्रांतीमुळे दर्शनाची रांग थेट चंद्रभागेच्या तीरावरून पुढे गेली होती. महिलांसोबत गैरप्रकार घडू नयेत म्हणून पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता.

श्री विठ्ठल रुक्मिणीच्या पदस्पर्श दर्शन रांगेत रविवारी भल्या पहाटेपासून भाविकांनी गर्दी केल्यामुळे काही वेळ गोंधळ उडाला होता. दोन वर्षाच्या निर्बंधानंतर तसेच यंदा शनिवार व रविवार असे दोन दिवस सुट्टीचे आल्यामुळे मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती.

### ३० प्रकारच्या भाज्यांची सजावट

मकर संक्रांतीनिमित्त पहिल्यांदाच विठ्ठल मंदिर भोगीच्या ३० प्रकारच्या भाज्यांनी सजवण्यात आले. भोगीसाठी लागणाऱ्या भाज्या, फळे आणि फुलांच्या मदतीने ही आकर्षक सजावट करण्यात आली होती. पुणे येथील भक्त अमोल शेरे यांच्या कुटुंबाने हा शृंगार चढवला. त्यामुळे 'कांदा मुळा भाजी, अवघी विठाई माझी' असे चित्र विठ्ठल मंदिरात तयार झाले होते. शेतातील ऊस, गव्हाच्या लोम्ब्या, ज्वारी आणि मक्याची कणसे, बोरे, जांभूळ, ढाळा यासह दोडके, भोपळा, कोबी, फ्लॉवर, शेवगा, सिमला मिर्च अशा जवळपास ३० प्रकारच्या दीड टन भाज्यांचा या सजावटीत पहिल्यांदा वापर केला गेला.

### असा हा देखणा सोहळा...

विठुरायाच्या चरणी आपल्या शेतातील नवधान्य अर्पण केल्याने भरभराट होते,अशी भक्तांची धारणा आहे. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर, मंदिरातील सभा मंडप, रुक्मिणी मंडप येथे महिलांनी सुगडांची पूजा करून एकमेकांची ओटी भरली. सुवासिनींचे लेण म्हणून वाणवसा देखील लुटला गेला. सुवासिनींनी जागोजागी चुडा भरताना दिसल्या. रुक्मिणी मातेला पहाटे साडेपाच वाजल्यापासून आकर्षक दागिन्यांचा पोशाख परिधान करण्यात आला होता. वाणवसा झाल्यानंतर या शेतकरी महिलांनी पारंपरिक गाणी म्हणत फेर धरत आपला आनंद साजरा केला.

## जि.प. कर्मचाऱ्याची एक लाख चाळीस हजाराची फसवणूक

✔ **मोहोळ** : जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची एटीएमचा ओटीपी विचारून १ लाख ४४ हजार रुपयांची फसवणुक केल्याची फिर्याद मोहोळ पोलीसात दाखल करण्यात आली आहे. याबाबत मोहोळ पोलीसांनी दिलेली माहीती अशी की सुनिल नारायण मस्के (रा.आण्णा भाऊ साठे नगर) यांना मोबाईल वरून फोन आला आणी तुमचे क्रेडीट कार्ड हे बंद होत आहे ते चालु करण्यासाठी तुम्ही माहिती सांगा असे म्हणाल्या वर सुनिल मस्के यांनी सध्या माझ्या जवळ क्रेडीट कार्ड नसल्याचे सांगीतले दुसऱ्या दिवशी पुन्हा फोन आला तेव्हा कार्ड जवळ घेऊन त्यांनी विचारलेली माहीती नाव, गाव, पत्ता वडीलांचे आणि आईचे नाव तसेच पॅन कार्ड चा नंबर हे सर्व संगीतली त्यानंतर त्याला ओटीपी नंबर विचारला तो देखील त्याने दिला. त्या नंतर लगेच क्रेडीट कार्ड मधील ५१ हजार रुपये कट झाल्याचा मेसेज आला त्यानंतर थोड्या वेळाने २४ हजार,२० हजार, १० हजार असे एकुण १ लाख ४४ हजार रुपये कट झाल्याचा मेमेस आला तेव्हा मात्र आपली फसवणुक झाल्याचे लक्षात येताच मस्के त्यांनी लगेच आपले क्रेडीट कार्ड बंद केल्याने पुढील पैसे जाणे टळले.या फसवणुकीची तक्रार सुनिल मस्के यांनी मोहोळ पोलीसात दाखल केली आहे.



श्री सिद्धेश्वरच्या यात्रेच्या तिसऱ्या दिवशी होम मैदानावर होम प्रदीपन सोहळा भक्ती भावाने पार पडला. (छायाचित्र - अप्पा बनसोडे)

## डॉ.तांबे यांच्यावर निलंबनाची कारवाई

✔ **मुंबई** : विधान परिषदेच्या नाशिक पदवीधर मतदारसंघासाठी उमेदवारी जाहीर करूनही डॉ. सुधीर तांबे यांनी उमेदवारी अर्ज न भरल्याने त्यांच्यावर काँग्रेस पक्षाने कारवाई केली आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करणार असल्याचे सांगत चौकशी पूर्ण होईपर्यंत डॉ. सुधीर तांबे यांचे काँग्रेस पक्षातून निलंबन केले गेले आहे. काँग्रेस पक्षाने कारवाई केल्याचे तसं पत्रच जारी केले आहे. पक्षाच्या भूमिकेविरोधात जाऊन पाऊल टाकल्याने काँग्रेस पक्षश्रेष्ठींनी तांबे यांना हिसका दाखवला आहे. नाशिक पदवीधर मतदारसंघासाठी सुधीर तांबे यांना काँग्रेस पक्षाकडून अधिकृतपणे उमेदवारी देण्यात आली होती. पक्षाकडून त्यांच्या उमेदवारीची अधिकृत घोषणा झाल्यानंतरही त्यांनी ऐनवेळी उमेदवारी अर्ज न भरता सत्यजित तांबे यांनी अपक्ष अर्ज भरला. या प्रकाराने काँग्रेस पक्षात एकच खळबळ उडाली होती.

## पैशाच्या व्यवहारावरून चाकूने भोसकले

✔ सुराज्य/पंढरपूर

जुन्या पैशाच्या व्यवहारातून तरुणास लाथाबुक्याने मारहाण करून पोटात चाकू खूपसल्याची धक्कादायक घटना संक्रांतिदिवशी घडली. याप्रकरणी बबलू प्रक्षाळे, सोमनाथ खंकाळ, विक्रांत माने व दोन अनोळखी अशा एकूण पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



वाळूच्या पैशावरून वाद झाल्याच्या बातम्या प्रसारित झाले आहेत. मात्र या एफ आय आर मध्ये वाळूच्या पैशाचा कुठेही उल्लेख फिर्यादीने केला नाही. वाळूच्या पैशातून हल्ला झाला आहे, का याचा तपास पोलीस करत आहेत.

या प्रकरणी उमेश सुखदेव खाडे रा.आढीव यांनी गुन्हा दाखल केला आहे. घटनेची माहिती अशी की उमेश खाडे याचा बबलू प्रक्षाळे बरोबर आर्थिक व्यवहार होता. तो त्यांनी काही दिवसापूर्वीच पूर्ण देखील केला होता. मात्र यानंतर देखील बबलू वारंवार त्याच्याकडे पैशाची मागणी करीत होता. यावरूनच रविवार १५ रोजी बबलू याने उमेश यास भटुंबरे नजीक बोलवून घेतले. उमेश व त्याचा मित्र सोमनाथ सलगर हे दुचाकीवरून जात असताना विक्रांत माने याने त्यांची दुचाकी अडवली तर सोमनाथ खंकाळ याने त्याच्या छातीत दगड घातला. यावेळी उपस्थित असलेल्या दोघांनी लाथा बुक्याने मारहाण केली तर बबलू याने हातातील चाकू उमेशाच्या पोटात खूपसला तसेच तुला जिवंत ठेवणार नाही अशी धमकी देखील दिली. याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी बबलू प्रक्षाळे, सोमनाथ खंकाळ याला पोलिसांनी ताब्यात घेतली आहे पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक आदिनाथ खरात करत आहेत.

## चिप्पा मार्केट येथे अनोळखी इसमाच्या डोक्यात फरशी टाकून खून

✔ सुराज्य/सोलापूर

शहरातील अशोक चौक परिसरात असलेल्या चिप्पा मार्केटमध्ये एका अनोळखी इसमाच्या डोक्यात फरशी टाकून निर्घृण खून केल्याचे रविवारी सकाळी उघडकीस आले.

महानगरपालिकेच्या चिप्पा मार्केट येथील १२७ क्रमांकाच्या कट्ट्यावर एका अनोळखी इसमाचा मृतदेह डोक्यात फरशी टाकून खून केलेल्या अवस्थेत आज सकाळी एकाच्या नजरेस पडले.याची माहिती जेलरोड पोलिसांना मिळाल्यानंतर पोलीस निरीक्षक मोगल यांच्यासह वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी येऊन पाहणी केली.त्यावेळी मयताच्या डोक्याजवळ अंदाजे २०ते २२ किलो वजनाची फरशी रक्ताने माखलेली आढळली. कवटी फुटून मेंदू बाहेर आल्याने मयताचा चेहरा ओळखू येत नव्हता.पोलिसांनी स्वान पथकाद्वारे आरोपींचा शोध घेण्याचा प्रयत्न केला पथकातील स्वान काही अंतरापर्यंत जाऊन घुटमळत राहिला.पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनाकरिता शासकिय रुग्णालयाकडे पाठवून दिले.




मयताच्या अंगावर लाल रंगाचे बारीक फुले असलेला पोपटी शर्ट आणि फिकट निळ्या रंगाची जीन्स पॅन्ट आहे. त्याच्या उजव्या हातावर गोंदलेले अस्पष्ट खुण आहे. या संदर्भात कोणास माहिती असल्यास त्यांनी जेलरोड पोलीस ठाण्यातील सहाय्यक निरीक्षक चिंताकिंदी यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

### अद्याप ओळख पटलेली नाही


खून झालेल्या युवकाचे वय अंदाजे ३५ वर्षे असून त्याच्या एका हातावर गोंदले आहे.परंतु त्याचा सुंता झाला आहे. जेलरोड पोलीस ठाण्याच्या पथकाने आजूबाजूच्या सर्व परिसरात या संदर्भात माहिती दिली.तसेच मार्केटमधील बागवान कुरेशी यांनाही यासंदर्भात माहिती विचारली. परंतु त्या युवकाची अद्याप ओळख पटलेली नाही.

---

महानगरपालिकेच्या या चिप्पा मार्केट मधील बरेच भाजी विक्रेते आणि इतर व्यापारी मार्केटमध्ये न बसता सत्तर फूट रोडवर व्यवसाय करतात. त्यामुळे या मार्केटमध्ये नेहमी शुकशुकाट असतो.रात्रीच्या वेळी मात्र या ठिकाणी व्यसनी लोकांचा वावर असतो. त्यातूनच हा प्रकार घडला असावा अशी चर्चा होती.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



त्यांना तीळ टेकवून, गूळ तुम्हीच खाल्लात म्हणे?

# अख्ख्या महाराष्ट्रावर पांघरली गेलीय गुलाबी चादर...

## ▶▶ पहाटेच्या धुक्यात हिरवाईवर चमकतायेत दवबिंदूचे मोती...

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूरसह सारा महाराष्ट्र कडाक्याच्या थंडीने गारठून गेला आहे. काही आठवडे उकाडा तर काही दिवस थंडी असा मजेशीर अनुभव राज्याला येत आहे. दोन आठवड्यांपूर्वी राज्यात उन्हाची तीव्रता वाढली होती.जो थंडीचा महिना,त्या डिसेंबरमध्ये उनाचे चटके बसत होते. आता मात्र महाराष्ट्रात सर्वदूर थंडीची लाट पसरलीय. उकाड्याचे शहर अशी ओळख असलेल्या मुंबईनेही यंदा कूस बदलत थंडीची गुलाबी चादर पांघलीय. तर तिकडे देवभूमी कोकणही बोचऱ्या थंडीने गारठून गेले आहे.या बोचऱ्या थंडीत मात्र दिवसभर सूर्याची किरणे ऊबदार ठरत आहेत.

विदर्भ, मराठवाड्यासह पश्चिम महाराष्ट्रातही थंडीमुळे शेकोट्या पेटल्या आहेत. अनेक भागांतील शेतशिवारात, डोंगरदऱ्यांतील झाडा-झुडुपांवर दवबिंदूंचे मोती चमकताना दिसतायत. मॉर्निंग वॉकला जाणाऱ्यांची संख्या रोडावली असली तरी अनेक ठिकाणी शेकोट्या पेटवून थंड हवेत ऊब घेतली जातीय. कोनाड्यात पडलेले स्वेटर, कानटोप्या आता बाहेर आल्या असून कच्चा-बच्चांपासून ते वयस्कर मंडळीही ऊबदार कपडे घालून वावरताना दिसतायत. मुंबईचा शेजार लाभलेल्या पालघर, ठाणे, भिवंडी आणि नवी मुंबईलाही चांगलीच हुडहुडी भरलीय. भर थंडीत दात थडथडवत वाफाळत्या चहाचा, तर कुठे गरमागरम भजी आणि मिसळीवरही ताव मारले जातायत. सूर्य डोक्यावर येऊन सूर्याची किरणे अंगावर येईपर्यंत असे चित्र दिसून येतेय. तर अनेक भागांत तळहात चोळत कोवळ्या उन्हाची किरणे अंगावर घेतली जातायत. त्यातच ऐन संक्रांतीच्या दिवशी वातावरणाने थंडीची भेट दिल्याने तीळगुळाचा गोडवाही लज्जतदार ठरला.

राज्यात मागील काही दिवसांपासून उत्तरेकडून वाहणाऱ्या वाऱ्याचा वेग वाढल्याने थंडीचा तडाखा वाढतोय. यामुळे राज्यातील बहुतांश जिल्ह्यांत थंडीची लाट आली आहे. यात मुंबई, पुणे, नाशिकमध्ये नागरिकांना बोचऱ्या थंडीचा अनुभव मिळत आहे. पुढील ८ दिवस थंडीची लाट कायम राहण्याती शक्यता आहे.

मागील चार दिवसांपासून मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भात कोकणात थंडीची लाट आली आहे. विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रातील नाशिक, नंदुरबार, जळगाव या जिल्ह्यांत तसेच परभणी, गोंदिया, अकोला, बुलढाणा, ब्रह्मपुरी, चंद्रपूर,



नागपूर, वाशिम, वर्धा, यवतमाळ जिल्ह्यांतही थंडीचा कडाका कायम आहे.पुणे, सातारा, सांगली, महाबळेश्वर, सोलापूर, कोल्हापूर जिल्ह्यातही किमान तापमानात घट झाली आहे.

CMYK

# प्रदूषणाचा विळखा

आपल्या देशात लोकांच्या जीवनाशी निगडित असलेले अनेक प्रश्न आपल्या भोवती घोंगावत आहेत पण त्याची कुणाला चिंता ना फिकिर. आपले जीवन व्यवस्थित चालले आहे ना. बस्स... हीच आपल्या जनतेची मानसिकता. सत्ताधीश तरी काय करणार? त्यांच्याकडून स्वयंसेवी संघटनांकडून केवळ इव्हेंट होतात आणि पुढे लोक सारे विसरून जातात. एखादी मोठी आपत्ती आली की मग तेव्हा कुठे डोळे उघडायला लागतात. त्यातून काय उपयोग होणार? कारण वेळ निघून गेलेली असते. आता प्रदूषणाचा गंभीर प्रश्न देशापुढे उभा राहिला आहे. 'राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमा'ची सुरुवात होऊन चार वर्षे पूर्ण झाल्याच्या केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून नुकत्याच जाहीर करण्यात आलेल्या आकडेवारींनुसार देशातील विविध शहरांमध्ये हवेतील प्रदूषित कणांच्या प्रमाणात मर्यादेपेक्षा वाढ असल्याचे दिसून आले आहे. त्यात दिल्ली शहरामध्ये या कणांचे प्रमाण सुरक्षित पातळीच्या दुप्पट असल्याचे सांगण्यात येते. परिणामी २०२२मध्ये दिल्ली हे भारतातील सर्वांत प्रदूषित शहर ठरले आहे. हवेच्या प्रदूषणाचे प्रमाण सर्वाधिक असलेल्या शहरांनी प्रदूषणाच्या पातळीत किरकोळ सुधारणा केली असली, तरी ती अद्यापही मर्यादेपेक्षा अधिकच असल्याचे दिसून येत आहे. 'राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम' (एनसीएपी) हा केंद्रीय पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालयाने २०१९मध्ये सुरू केलेला सरकारी कार्यक्रम आहे. २०२४ सालापर्यंत प्रदूषित सूक्ष्म कणांचे प्रमाण किमान २० टक्क्यांनी कमी करण्याचे प्रमुख उद्दिष्ट असलेला हा कार्यक्रम प्रदूषण नियंत्रण उपक्रम आहे. राष्ट्रीय वायू गुणवत्ता निरीक्षणाचे जाळे विस्तारित करणे, वायू प्रदूषण व्यवस्थापनासाठी क्षमता निर्माण करणे, वायू प्रदूषणाच्या धोक्यांबाबत जनजागृती करणे, वायू प्रदूषण प्रतिबंध, व्यवस्थापन आणि नियंत्रण आदी उद्दिष्टांचा या कार्यक्रमात सहभाग आहे. देशातील १०२ शहरांमध्ये प्रदूषण कमी करण्याबाबत उपाययोजना केल्या जात आहेत. कार्यक्रमाची अंमलबजावणी



पर्यावरण मंत्रालय स्तरावरील सर्वोच्च समितीद्वारे केली जाईल. राज्यस्तरावर मुख्य सचिव स्तरावरील समित्या या योजनेच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवत आहेत. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय, नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय, अवजड उद्योग मंत्रालय, आरोग्य मंत्रालय, गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालय, कृषी मंत्रालय, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, नीती आयोग आदींसह या राष्ट्रीय कार्यक्रमामध्ये शैक्षणिक संस्था आणि स्वयंसेवी संस्थांचा सहभाग घेण्यात येत आहे. अतिसूक्ष्म प्रदूषित कणांचे हवेतील प्रमाण प्रति घनमीटर मायक्रोग्राममध्ये ० ते ५० असल्यास हवेची गुणवत्ता उत्तम असते. ५१ ते १०० मध्ये ती समाधानकारक, तर १०१ ते २०० मध्ये हवेची गुणवत्ता सामान्य समजली जाते. मात्र, त्यानंतरच्या आकडेवारींची प्रत्येक श्रेणी मानवी आरोग्यासाठी धोकादायक समजली जाते. संपूर्ण देशामध्ये राजधानी दिल्लीमध्ये सर्वाधिक प्रदूषण असल्याचे वेळोवेळी दिसून येते. २०२२ या संपूर्ण वर्षातही दिल्ली शहर सर्वाधिक प्रदूषित शहर म्हणून कायम राहिले. दिल्ली शहरामध्ये प्रति घनमीटर प्रदूषित अतिसूक्ष्म कणांचे प्रमाण वर्षाला सरासरी ९९.७ इतके राहिले आहे. केंद्रीय प्रदूषण मंडळाच्या मानकांपेक्षा ते दुपटीहून अधिक आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून देशातील सध्याची प्रदूषित कणांची वार्षिक सरासरी आणि सुरक्षित मर्यादा प्रतिघनमीटर ४० प्रतिघनमीटर आहे. दिल्लीतील पीएम २.४ या सूक्ष्म कणांची हवेतील पातळी गेल्या तीन वर्षांच्या तुलनेत ७ टक्क्यांनी वाढली आहे. 'राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमांतर्गत' उपाययोजना करण्यात येत असलेल्या विविध शहरांमध्ये हवेतील प्रदूषित अतिसूक्ष्म कणांच्या पातळीत २०२६ पर्यंत ४० टक्के कपात करण्याचे नवे लक्ष्य ठेवले आहे. कार्यक्रमाच्या गेल्या चार वर्षांमध्ये शहरांना याबाबतच्या उपाययोजनांसाठी ६,८९७ कोटींचा निधी देण्यात आला आहे. मात्र, सद्य:स्थितीत देशातील सर्वांत प्रदूषित पहिल्या दहा शहरांमध्ये दिल्लीसह गंगेच्या मैदानी प्रदेशातील आहेत. बिहारमधील पाटणा, मुझफ्फरपूर आणि गया ही शहरे पीएम २.५ च्या पातळीच्या आधारावर सर्वाधिक प्रदूषित शहरांमध्ये आहेत. त्यानुसार दिल्लीनंतर फरिदाबाद, गाझियाबाद, पाटणा, मुझफ्फरपूर, नोएडा, मेरठ, गोबिंदगड आणि जोधपूर ही शहरे २०२२ मध्ये सर्वाधिक प्रदूषित पहिली दहा शहरे ठरली. मुंबई शहराचाही समावेश आहे. वास्तविक पाहता देशातील लहान शहरांनाही हवेच्या प्रदूषणाने घेरले आहे. या प्रदूषणाला आपणच जबाबदार आहोत. तेंव्हा हे प्रदूषण कमी करण्याची जबाबदारी आपलीच आहे, एवढे जरी भान ठेवले तरी देशहित ठरेल.

## राजकीय

# राज्यपाल विरुद्ध मुख्यमंत्री

तामीळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवी आणि मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांच्यातील संघर्ष विकोपाला गेला असून राज्यपाल विरुद्ध मुख्यमंत्री ही लढाई आता द्रमुक विरुद्ध भाजप अशी सुरू झाली आहे. चेन्नई विधानसभेत राज्यपालांच्या विरोधात घोषणा दिल्या गेल्या. अभिभाषणानंतर सभागृह सोडून जाण्याची त्यांच्यावर वेळ आली. त्यांच्या समोरच त्यांच्या विरोधात मुख्यमंत्र्यांनी प्रस्ताव मांडला व तो बहुमताने संमत झाला. द्रमुक समर्थकांनी गेट आऊट रवी अशी पोस्टर्स राज्यात झळकवली. या सर्व घटना संसदीय लोकशाहीला काळीमा फासणाऱ्या आहेत. या संघर्षाला द्रविड विरुद्ध आर्य असा प्रादेशिक अस्मितेचा रंग दिला जात आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आंध्र प्रदेश, तेलंगणा, केरळ, तामिळनाडू ही दक्षिणेकडील राज्ये प्रादेशिक भाषा व प्रादेशिक अस्मिता या निकषावर उभी राहिली. राष्ट्रीय नेतृत्वापेक्षा स्थानिक नेतृत्वावर येथील जनतेचा जास्त विश्वास आहे. या राज्यांतून लोकसभेवर १२९ खासदार निवडून येतात. संसदेत ते नेहमीच दबाब गट म्हणून वावरत असतात. केंद्र सरकारच्या निर्णयाला विरोध करण्याचे सामर्थ्य या राज्यातील खासदार दाखवतात.

नवीन वर्षाच्या पहिल्या अधिवेशनात पहिल्या दिवशी राज्यपाल हे आमदारांच्या संयुक्त बैठकीत अभिभाषण करतात, ही परंपरा आहे. अभिभाषण म्हणजे सरकारचे धोरण व आगामी कार्यक्रम यांचे प्रतिबिंब असते. रवी यांनी सरकारने दिलेल्या भाषणातील द्रविड मॉडेल, पेरियार, धर्मनिरपेक्षता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, करुणानिधी आदी शब्दांचे वाचन केले नाही. स्टॅलिन यांनी त्याला वेळीच आक्षेप घेतला. राज्यपाल सरकारने दिलेल्या भाषणातील उतारे जाणीवपूर्वक वगळत आहेत, असा आरोप त्यांनी केला. सत्ताधारी सदस्यांनी घोषणा देऊन राज्यपालांचा निषेध केला. त्यांच्या समोरच तामिळनाडूचा जयजयकार केला, अंगलनाडू तामिळनाडू (आमची जमीन तामिळनाडू) अशा घोषणा दिल्या. राज्यपालांनी भाषणात तामिळनाडू ऐवजी राज्याचा उल्लेख तमिझगम असा केल्याने द्रमुकचे सदस्य संतप्त झाले. सरकारने लिहून दिलेले भाषणच पटलावर ठेवावे, असा प्रस्ताव स्टॅलिन यांनी त्यांच्या समोर मांडला व बहुमताने तो संमत झाला. राज्यपाल मात्र सभागृहातून ताडकन निघून गेले.

रवी हे तामिळनाडूचे राज्यपाल म्हणून आल्यापासून येथे सरकार विरुद्ध राज्यपाल असा संघर्ष चालू आहे. रवी हे इंटेलिजन्स ब्युरोमध्ये उच्चपदस्थ अधिकारी होते. ऑगस्ट २०१९ ते सप्टेंबर २०२१ या काळात ते नागालँडचे राज्यपाल होते. चेन्नईला आल्यापासून द्रमुक विरुद्ध राजभवन असा संघर्ष चालू आहे. राज्यपालांनी आमच्यावर भाजप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची विचारधारा लादू नये, असे द्रमुकने म्हटले आहे. राज्यपाल रवी यांनी भाजपचे दुसरे प्रदेशाध्यक्ष म्हणून भूमिका बजावू नये, असे द्रमुक खासदार टी. आर. बाळू यांनी म्हटले



आहे. राज्य सरकारची बावीस विधेयके राजभवनावर पडून आहेत, त्यांना राज्यपाल मंजुरी देत नाहीत, असाही आरोप द्रमुकने केला आहे.

रवी हे दि. १० सप्टेंबर २०२१ पासून तामिळनाडूचे राज्यपाल म्हणून काम करीत आहेत. रवी यांनी राजभवनातून पोंगलचे निमंत्रण व्हीआयपींना पाठवले, त्यावर तामिळनाडू राज्याचे चिन्ह नाही, उलट राष्ट्रीय चिन्हाचा वापर केला आहे. शिवाय या अधिकृत निमंत्रणावर तामिळनाडू असा उल्लेख न करता तमिझगम' असा उल्लेख आहे. तामिळनाडू म्हणजे तमीळ राष्ट्र आणि तमिझगम म्हणजे तमीळ लोकांचे निवासस्थान. तमिझगम हे प्राचीन नाव आहे व तेच योग्य आहे, असे राज्यपाल सांगत असतात. रवी यांची भूमिका राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या लोकांना योग्य वाटत असली तरी मांडण्याची ही वेळ योग्य नाही, असे अनेकांना वाटते. मात्र प्रदेश भाजपने रवी यांचे समर्थन केले आहे व त्यांचे स्वागत करणारी पोस्टर्स लावली आहेत. सरकारने दिलेले भाषण राज्यपाल संपादित करू शकतात का? सरकारने दिलेल्या अभिभाषणात काटछाट करता येते का? मंत्रिमंडळाने मंजूर केलेल्या भाषणातील परिच्छेद वगळता येतात का? सरकारने भाषणात चुकीची आकडेवारी व खोटी माहिती दिली असेल तर तो मजकूर वाचणे राज्यपालांवर बंधनकारक आहे का? असे प्रश्न या निमित्ताने निर्माण झाले. १९३७ मध्ये देशातील ६ प्रादेशिक विभागात काँग्रेसची सत्ता आली तेव्हा सत्ता ग्रहण करण्यापूर्वी दैनंदिन कामकाजात व सरकारी निर्णयात ब्रिटिशांनी स्वेच्छाधिकार वापरून हस्तक्षेप करू नये, अशी अपेक्षा काँग्रेसने व्यक्त केली होती. तशीच अपेक्षा विरोधी पक्षांची सरकारे राज्यपालांविषयी व्यक्त करीत असतात. सरकारच्या सल्ल्यानंतर राज्यपाल अधिवेशन बोलवत असतात, अधिवेशनाच्या तारखा ते परस्पर बदलू शकत नाहीत. अरुणाचल प्रदेशचे राज्यपाल जे. पी. राजकोवा यांनी विधानसभेचे अधिवेशन ठरलेल्या तारखांच्या अगोदर बोलावले म्हणून वाद झाला होता. मंत्रिमंडळाच्या सल्ल्याशिवाय अधिवेशनाच्या तारखा राज्यपालांना बदलता येत नाहीत. राज्यपाल रवी यांनी सरकारने दिलेल्या भाषणातून काही भाग वगळला व स्वत:चे मतप्रदर्शन करणारा भाग जोडला म्हणून वाद निर्माण झाला. १९६७ मध्ये राजस्थानमधे राज्यपाल संपूर्णानंद यांनीही हाच प्रकार केला होता व तेव्हाही मोठा वाद निर्माण झाला होता. दि. ८ फेब्रुवारी १९६५. पश्चिम बंगालच्या राज्यपाल पद्मजा नायडू या अभिभाषणाच्या वेळी गोंधळ घालणाऱ्या सदस्यांना वारंवार सांगत होत्या, शांत राहा, मला बोलू दे...अखेर भाषण न वाचताच त्या निघून गेल्या. नंतर सभापतींनी त्यांचे भाषण पटलावर ठेवल्याचे घोषित केले. १९६६ मध्ये कलकत्ता उच्च न्यायालयाचे न्या. बी. एन. बॅनर्जी यांनी निकाल देताना म्हटले की, अभिभाषण वाचणार नाही, असे राज्यपाल म्हणू शकत नाहीत. त्यांनी घटनात्मक कर्तव्य पार पाडले पाहिजे. घटनेच्या १७६ कलमान्वये अभिभाषणाचे वाचन हे राज्यपालांचे कर्तव्य आहे. अभिभाषण वाचले नाही व ते पटलावर ठेवले हा अनियमितपणा आहे. मात्र ते बेकायदेशीर आहे, असे म्हणता येणार नाही, असे कलकत्ता न्यायालयाने म्हटले आहे. पश्चिम बंगालचे राज्यपाल धर्मवीर यांनीही अभिभाषणातील काही परिच्छेद वगळून वाचले होते. बंगालमधील अगोदरच्या संयुक्त आघाडीच्या सरकारसंबंधी त्यात काही संदर्भ होते. जे असंबंद्ध आहे ते आपण वाचणार नाही, अशी भूमिका राज्यपालांनी मांडली होती. उच्च न्यायालयाने त्यांची भूमिका वैध ठरवली.

१९६७ मध्ये राज्यपालांच्या अभिभाषणावर त्यांचे अभिनंदन करणारा प्रस्ताव विधानसभेने फेटाळला म्हणून पंजाबचे मुख्यमंत्री गुरनाम सिंग यांना राजीनामा द्यावा लागला होता. याच कारणावरून उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री सी. बी. गुप्ता यांनाही राजीनामा देणे भाग पडले होते. राज्यकारभार सुरळीत चालण्यासाठी राज्यपाल व मुख्यमंत्री यांच्यात सुसंवाद व सहकार्य उत्तम व नियमित असणे हे लोकशाहीत अपेक्षित आहे.

**- सुकृत खांडेकर.**

## टुडेज ब्लॉग

# सार्क संघटनेचे भवितव्य अंधारात

काठमांडूहून ८ जानेवारी रोजी एक वृत्त आले. नेपाळच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते भारत राज पौडेल यांनी राष्ट्रीय विधिमंडळाला सांगितले, की सार्कला सक्रीय करण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. या संदर्भातील माहिती 'माय रिपब्लिका' या वृत्तपत्राने दिली आहे. 'साऊथ एशियन असोसिएशन फॉर रिजनल कोऑपरेशन (सार्क)' या संघटनेच्या राष्ट्रप्रमुखांच्या पातळीवरील शिखर परिषदा २०१६ पासून झालेल्या नाही. संघटनाच ठप्प झाली आहे. शिखर परिषदा दोन वर्षातून एकदा होतात. यापूर्वी २०१४ मध्ये काठमांडू येथे झालेली शिखर परिषद शेवटची होती. त्यानंतर २०१६ मध्ये संघटनेची शिखर परिषद इस्लामाबाद येथे होणार होती. परंतु,''जम्मू काश्मीरमधील उरी येथे पाकिस्तानी दहशतवाद्यांनी भारतीय सेनेच्या छावणीवर हल्ला केल्याने शिखर परिषदेत भाग घेता येणार नाही,'' असे भारताने संघटनेला कळविले होते. त्यानंतर भारत व पाकिस्तान दरम्यानचे संबंध बिघडत गेले. आंतरराष्ट्रीय स्तरावरील कोणतेही व्यासपीठ असो, परराष्ट्रमंत्री डॉ. जयशंकर असो वा अन्य भारतीय प्रतिनिधी असो, पाकिस्तानच्या दहशवादाचे पितळ उघडे पाडण्याचे काम ते करीत आहेत. अमेरिका व युरोपला अमान्य असले, तरी ''पाकिस्तान हे जागतिक दहशतवादाचे केंद्र (एपिसेन्टर) बनले आहे,'' असे वर्णन जयशंकर करीत आहेत. त्यामुळे दहशतवादाला पाकिस्तान आळा घालीत नाही, तोवर भारत सार्क संघटनेच्या शिखर परिषदेत भाग घेणार नाही, हे स्पष्ट आहे. शिवाय भारताला वगळून सार्क शिखर परिषद होऊ शकत नाही हेही स्पष्ट आहे. त्यात आता भर पडली आहे, ती अफगाणिस्तानातील तालिबान सरकारची. अफगाणिस्तानात लोकशाही होती, तेव्हा अध्यक्ष हमीद करझाई यांचे व नंतर महंमद अश्रफ घनी अहमदझाईस यांचे सरकार असताना आठवा सदस्य म्हणून सार्क संघटनेत अफगाणिस्तानचा प्रवेश झाला होता. भारताव्यतिरिक्त श्रीलंका, पाकिस्तान, भूतान, बांग्लादेश, मालदीव, नेपाळ, मालदीव हे संघटनेचे सदस्य तर अमेरिका, दक्षिण कोरिया, म्यानमार, मॉरिशस, जपान, इराण, युरोपीय महासंघ, चीन व ऑस्ट्रेलिया ही संघटनेतील निरिक्षक राष्ट्रे आहेत. सार्क संघटनेतील देशात जगातील एकूण जमिनीपैकी ३ टक्के जमीन असली, तरी २०२१मध्ये जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी २१ टक्के लोकसंख्या व ५.२१ टक्के अर्थव्यवस्था संघटनेमध्ये आहे. हे पाहूनच प्रगत राष्ट्रांनी त्यात स्वारस्य दाखविले.

काही वर्षापूर्वी चीन व इराणनेही सार्क संघटनेचे सदस्यत्व मिळावे यासाठी प्रयत्न केले. तथापि, सार्क संघटनेला शाप आहे, तो भारत व पाकिस्ताच्या कायमच्या वैमनस्याचा. त्यामुळे कोणतीही शिखर परिषद झाली की त्यावर या दोन राष्ट्रांच्या मतभेदांची दाट छाया पसरते. परस्परांच्या सहकार्याबाबत अनेक मुद्यांवर गेली अनेक वर्षे खल चालला आहे.

उपखंडात भारताचा भौगोलिक विस्तार पाहता, त्यामानाने इतर राष्ट्रे छोटी आहेत, हे त्या राष्ट्रांना मान्य करावेच लागेल. व त्याची जाणीव ठेवावी




लागेल. परंतु, बांग्लादेश, भूतान वगळता जेव्हा जेव्हा पाकिस्तान, मालदीव, श्रीलंका, नेपाळ या राष्ट्रात नेतृत्वबदल झाला, त्यानुसार भारत व त्या सदस्य राष्ट्रात दुरावा निर्माण झाला व ही राष्ट्रे चीनकडे वळल्याचे दिसते. म्हणून सार्कमधील संबंध सांभाळण्याची कसरत वेळोवेळी भारताला करावी लागली आहे. 'शेजार प्रथम (नेबरहुड फर्स्ट)' हे धोरण राबविताना बऱ्याच अडचणीही आल्या आहेत. भारताने कोणत्याही राष्ट्रात ढवळाढवळ न करण्याचे धोरण जाहीर करून ही ''नेपाळ, मालदीव, पाकिस्तानमध्ये भारत ढवळाढवळ करतो,'' हा आरोप अधुनमधून ही राष्ट्रे करीत आली आहेत.

संघटनेचे सचिवालय काठमांडू येथे आहे. राजे बीरेंद्र बीर बिक्रमशहा यांनी १६ जानेवारी १९८७ रोजी त्याचे उद्घाटन केले होते. श्रीलंकेचे राजदूत एसाला रूवन वीरकून यांनी १ मार्च २०२० रोजी संघटनेचे महासचिव म्हणून सूत्रे हाती घेतली होती. सार्क उपग्रह, दक्षिण आशियायी विद्यापीठ, उपविभागीय आर्थिक सहकार्य, बिमस्टेक, मेकाँग-गंगा सहकार्य प्रकल्प आदी अनेक विभागीय संघटना सार्कच्या अंतर्गत सक्रीय आहेत. तथापि, सार्क सचिवालयाच्या वेबसाईटवर जाता, भावी कार्यक्रम कोणते आहेत, या मथळ्याखाली 'नो इव्हेन्ट' असे शब्द दिसतात. वीरकून यांनी सूत्रे हाती घेतल्यापासून सार्कचा ३६ वा चार्टर दिन, व्हर्चुअल मोडवर नियोजन मंत्र्यांची बैठक, कोविडच्या संदर्भात सहकार्य आदी कार्यक्रम झाले आहेत. सारांश, संघटनेला सक्रीय ठेवण्याचे प्रयत्न सुरू असले, तरी जोवर शिखर परिषद होत नाही, तोवर संघटनेला चालना मिळणार नाही, असेच दिसते.

भारताने २०१६ मध्ये शिखर परिषदेवर बहिष्कार टाकल्यानंतर बांग्लादेश, भूतान, अफगाणिस्तान व श्रीलंका या सदस्य राष्ट्रांनीही पाकिस्तान कराची येथे होणाऱ्या १९ व्या शिखर परिषदेवर बहिष्कार टाकला होता. ती परिस्थिती आजही बदलेली नाही.

**- विजय नाईक.**

## जन्म हा अखेरचा

### धर्माचारस्थल - ६



हातात दिवा घेऊन तुम्ही अंधारात निघालात तर तो दिवा अंधार दूर करतो. त्याप्रमाणे तुमच्या जवळचा धर्म तुम्ही जेथे कुठे जाल तेथले अज्ञान आणि अधर्म नष्ट करतो. रात्र कितीही अंधारलेली असली तरीही तुमच्या मुठीतला प्रकाश तुम्ही ज्या वाटेवर चालाल ती वाट उजळून टाकतो. हाती प्रकाश असेल तर अंधाराचे भय बाळगायचे कारण नाही. तुमची वाट पावलापावलांवर उजळत जाईल. हातात प्रकाश नसेल तर दगडधोंड्यांना ठेचकाळण्याशिवाय गत्यंतर नाही. त्याप्रमाणे तुमच्या हृदयातला धर्म तुम्हांला आत्मोद्धाराची वाट दाखवत असतो. सुखी व्हायचे असेल तर प्रत्येकाने धर्माचरण करायला हवे. केवळ धर्मच त्रैलोक्याला उजळून टाकू शकतो.

भावाचारस्थल - १

काशीला 'आनंदकानन' असे म्हणतात. कानन म्हणजे अरण्य. सर्वांना परमानंद देणाऱ्या भगवान शिवाचे वास्तव्य काशीला असल्यामुळे सर्वांना येथे केवळ आनंदाचीच प्राप्ती होते. दु:खापासून मुक्ती मिळवण्यासाठी सारे लोक काशीला येत असतात. काशीला आनंद मिळत नसेल तर मग कुठे मिळेल? आनंदप्राप्तीसाठी आपल्याला काही साधना करावी लागते. केवळ मागितल्याने आनंद मिळत नसतो. आनंद सर्वांना हवा असतो. परंतु ज्यामुळे आनंदाची प्राप्ती होते ते धर्माचरण मात्र कुणाला नको असते, असे महाभारतात म्हटले आहे. धर्माचरणाशिवाय आनंद प्राप्त होत नाही. मोबदला दिल्याशिवाय या जगात काहीही मिळत नाही. **(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

# सोशल मीडिया अश्लील होत चाललाय

सोशल मीडियाच्या माध्यमातून सामान्य जनतेची एक चांगल्याप्रकारे करमणूक होत असते. मोबाईलचा वापर हा आजच्या काळात प्रत्येक जण करीत आहे व तसेच समाजातील प्रत्येक क्षेत्रातील माणूस हा या दृष्टिकोनातून मोबाईलमधील व्हाट्सअप, फेसबुक, गुगल, इंस्टाग्राम किंवा अन्य अशा सोशल मीडियाचा वापर करताना दिसून येत आहे. त्यामध्ये प्रामुख्याने तरुण मुले, मुली, स्त्रिया, पुरुष सर्वजण वापर करतात. या सोशल मीडियामध्ये काही चांगल्या गोष्टीही आढळून येतात. त्यामध्ये कोणाचा वाढदिवस, कोणी एखादे जुने गाणे गाऊन दाखवीत आहेत, काही विनोद, काही कुटुंबामध्ये घडणाऱ्या लहान-सहान घटना यातून निर्माण होणारे वाद, त्या वादातून निघणारे चांगले निष्कर्ष व त्या निष्कर्षातून समाजाला होणारे उपजत ज्ञान तसेच राजकारणी नेत्यांचे भाषण, वेगवेगळी वक्तव्ये पाहायला मिळतात तर काही आरोग्याच्या दृष्टिकोनामधून काही महत्त्वाचे सल्लेही मिळत असतात.



असा हा सोशल मीडिया चांगली शिकवण देणारा, चांगले विचार सांगणारा आजकाल अश्लील होत चाललाय. काही ठिकाणी मित्र-मित्र टिंगल टवाळी करताना तर दिसायचीच. पण आता त्यात आणखीन एक भर पडली आहे, ती म्हणजे सेक्सी फोटो सेक्शनची. आजकालच्या आघाडीच्या अभिनेत्रींनी आपले फोटो गुगलवर व इंस्टाग्रामवर प्रसारित करीत आहेत. हे त्यांचे फोटो सेक्सी स्वरूपातील आहेत. असे फोटो पाहून लहान मुले, तरुण मुले बिघडतील. त्या फोटोंचा त्यांच्या मनावर विकृत परिणाम होईल व समाजातील सुसंस्कृतपणाचे वातावरण दूषित होऊन जाईल. त्यामुळे समाज व्यवस्था बिघडत आहे. तरुण मुलांच्या मनावर त्याचे वाईट परिणाम होत आहे. त्याचे समाज मनावर वाईट परिणाम होत आहेत. कमी घातलेल्या कपड्यामधील फोटो सोशल मीडियावर प्रसारण करणे योग्य नाही. तरी आजकालच्या अभिनेत्रींनी आपले फोटो सेशन हे सिनेमॅगेझीन किंवा सिने नियतकालिकामधून प्रसिद्ध करावेत. कदाचित आपले फोटो चित्रपटाचे निर्माता व निर्देशक पाहतील व ते आपल्याला त्यांच्या चित्रपटात काम देतील. यामुळे आपल्याला प्रसिद्धी व पैसा दोन्हीही मिळेल असे वाटते.

**- अनिल जाधव, बार्शी.**

# तांबेंची तिरकी चाल!

**नाशिक पदवीधर मतदारसंघात शेवटच्या क्षणापर्यंत चाललेला 'हाय होल्टेज ड्रामा' भल्याभल्यांना कोड्यात टाकणारा ठरला. तांबे कुटुंबीयांची ही 'चाल' कोणत्या दिशेने आहे, हे गुपित मात्र लवकरच उलगडणार आहे.**

काँग्रेसच्या भल्याबुऱ्या काळातही तब्बल पन्नास वर्षे पक्षातच राहून निष्ठेचा आदर्श वस्तुपाठ घालून देणारे जयप्रकाश छाजेड यांनी इहलोकीचा प्रवास संपविला, त्याच्या दुसऱ्याच दिवशी अशीच प्रदीर्घ कारकिर्द असलेल्या थोरात घराण्यातील पुढची पाती सत्यजित तांबे यांनी पक्षाला तोंडघशी पाडून अपक्ष उमेदवारी केली. निष्ठेच्या चिंधड्या उडविण्याचा हा प्रवास आता काँग्रेसला काही नवा राहिलेला नाही. तरीही तांबेंकडून अशी कृती अपेक्षित नव्हती, याबाबत बव्हंशी लोकांचे मतैक्य होईल. नाशिक पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत अर्ज भरण्याच्या अखेरच्या दिवशी शेवटच्या सत्रात जो 'हाय व्होल्टेज ड्रामा' झाला, त्यामुळे काँग्रेस डावपेचात अजूनही चाचपडतेय तर भाजप, विशेषत्वाने देवेंद्र फडणवीस मात्र चाणक्य नीतीत कितीतरी उजवे ठरताना दिसतात. तांबे यांनी केले ते योग्य की अयोग्य याची चर्चा होतच राहील, पण फडणवीस यांनी अवघ्या महिनाभराच्या अंतरात कट्टर काँग्रेस कार्यकर्त्याला आपल्या बाजूने वळविण्यात जी काही मुशाफिरी केली तिला तोड नाही. इतर पक्षातील लोक फोडताना भाजप ज्या काही उचापत्या करतो, त्याबद्दल समाजाच्या काही घटकांमध्ये संताप असला तरी जी माणसं फुटतात त्यांच्यातील महत्त्वाकांक्षेला खतपाणी घालून त्यांची मानसिकता बदलविण्याचे जे काम हा पक्ष नियमितपणे करीत आहे, हे लक्षणीय असेच. कॅलिफोर्नियाचे महापौर व गव्हर्नर राहिलेले गॅविन न्यूसम यांच्या 'सिटिझनविल' या पुस्तकाचा सत्यजित तांबे यांनी अनुवाद केला. या अनुवादित पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात सत्यजित यांचे मामा काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात, राष्ट्रवादीचे नेते अजित पवार व उपमुख्यमंत्री देवन्द्र फडणवीस यांची उपस्थिती होती. तेव्हा फडणवीस यांनी केलेल्या भाषणात, सत्यजितसारख्या तरुणांना असे मोकळे सोडू नका. त्यांना 'विधीमंडळात येऊ द्या, अन्यथा अशांवर आमचा डोळा असतोच', असे थेट आव्हान दिले होते. तेव्हा ते गंमतीने घेतले गेले. पण त्याचा मथितार्थ काँग्रेसला आज कळला असेल. तांबे यांना विधीमंडळात येऊ द्या, असे जेव्हा फडणवीस म्हणतात तेव्हा तांबेंची सुप्त वा उघड इच्छा त्यांना कळली कशी याचा विचार काँग्रेसने करायला हवा होता. ज्याअर्थी फडणवीस यांनी जाहीर समारंभात सत्यजित यांचे असे कौतुक करीत आपली दारे खुली असल्याची जाहीर 'ऑफर' दिली, तेव्हा त्यातील गर्भितार्थ समजून घेण्यात काँग्रेस कमी पडली असे आज म्हणता येते. किंबहुना बाळासाहेब थोरात हे देखील गाफिल राहिले असेच दिसते.

सत्यजित हे महत्त्वाकांक्षी तर आहेतच, पण या आकांक्षा पूर्ण करण्याची जिद्द व हिंमत त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आहे, हे यापूर्वी अनेकदा पक्षीय व्यासपीठावरही दिसले आहे. त्याचमुळे जेंव्हा केंव्हा त्यांनी आपली इच्छा कौटुंबिक पातळीवर बोलून दाखविली असेल तेंव्हा त्यातील गांभीर्य एकतर सुधीर तांबे, बाळासाहेब थोरात व इतर कुटुंबीयांच्या लक्षात आले नसेल किंवा त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले असावे. वास्तविक गेले महिनाभर तांबे यांच्या पक्षांतराची चर्चा नगर जिल्ह्यात सुरू आहे. प्रत्येक वेळी सत्यजित यांनी त्याचा इन्कार केला खरा, पण नेमक्या त्याचवेळी आपल्या पुस्तकाच्या प्रसिद्धीच्या निमित्ताने त्यांनी केलेले दौरे राजकीय निरीक्षकांच्या भुवया उंचावणारे ठरले. अचानक त्यांनी नाशिकमध्ये अधिक रस घ्यायला सुरुवात केली, तेंव्हाही हाच किंतू बोलला गेला. दस्तुरखुद्द सत्यजित मात्र, सुशासनातील सार्वजनिक सहभाग वाढावा यासाठी कॅलिफोर्नियाने तंत्रज्ञानाचा कसा उपयोग करून घेतला याविषयीच्या पुस्तकातील उताऱ्यांवर बोलत होतेच, शिवाय हा राजकारणबाह्य विषय आहे हे आवर्जून सांगत होते. तांबे यांचा या विशिष्ट उद्देशासाठी अधिक व्यापक असा विचार तेव्हा योग्य वाटत होताच, पण त्याबरोबरीनेच



काँग्रेसची चौकट सोडून ती अधिक व्यापक करून थेट भाजपपर्यंत पोहोचण्याची त्यांची मानसिकता असावी याचा साक्षात्कार मात्र आता होतो आहे. भाऊसाहेब थोरातांपासून ते वडील सुधीर तांबे यांचे उदाहरण देताना ते नेहमीच काँग्रेस संस्कृतीची जपमाळ ओढत. राहुल गांधी यांच्याशी असलेले त्यांचे घनिष्ठ संबंध, थोरात परिवाराची काँग्रेसशी असलेली निष्ठा पाहून असे काही सत्यजित करतील असे अनेकांना वाटत नव्हते. धक्का त्यामुळेच थोडा अधिक बसला. अर्थात ते स्वाभाविकही होते. पण अशाप्रकारे बंड करून पुन्हा पक्षात परतून पावन होण्याची त्यांच्याच घरात परंपरा असल्याने तांबे यांनी या परंपरेचे पालन केले असेही म्हणता येऊ शकेल. सत्यजित तर या उदाहरणांसह आपली बाजू पटवूनही देत आहेत. व अत्यंत सौजन्यशील वर्तणूक या जोरावर तांबे लोकप्रिय झाले. काही दिवसांपूर्वी अगदीच नीरस वाटणारी ही निवडणूक सत्यजित तांबेंच्या निर्णयाने एकाएकी उत्साहवर्धक बनली आहे. शुभांगी पाटील यांना पाठिंबा देऊन ठाकरे गटाने या चुरशीत रंगत आणण्याचा प्रयत्न केला आहे. सध्यातरी तांबे यांना निवडणूक अवघड दिसत नाही. पाटील किती धाव घेतात यावर ही लढाई चुरशीची की एकतर्फी याचा फैसला होईल.

**- शैलेन्द्र तनपुरे.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# माढा शिवसेना संपर्कप्रमुखांची सरकारी यंत्रणेवर नाराजी

## पालकमंत्र्यांना घातले साकडे, जाहीर वाच्यता केल्यास युतीवर परिणाम

✔ सुराज्य/सोलापूर

राज्यामध्ये भाजप आणि बाळासाहेबाची शिवसेनेच्या युतीची सत्ता आहे. शिंदे - फडणवीस सरकार आहे. भाजप शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांना अशा वाढल्या होत्या मात्र आमची दखल कोणीतरी घेतली जाईल असे वाटले होते. राज्यात महाआघाडीचे सरकार असताना शिवसेना सत्तेत असताना जी वागणूक राष्ट्रवादीकडून मिळाली ती परिस्थीती कायम आहे. मुख्यमंत्र्यांनी विकास कामांना मान्यता देऊन कामे होत नाही आपण जाहीर वाच्यता केल्यास राज्यसकारच्या युतीवर परिणाम होण्याची शक्यता असल्याने माढा विधानसभा मतदारसंघातील कामे मंजूर करत असताना व माढा तालुक्यातील शासकीय कमिट्यांचे गठन करत असताना आपल्या सूचनेचा अग्रक्रमाने विचार असे साकडे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना माढा विधानसभा शिवसेना माजी उमेदवार विद्यमन संपर्कप्रमुख लोकसभा बाळासाहेबांची शिवसेनेचे संजय कोकाटे यांनी घातले आहे.


पालकमंत्र्यांना कोकाटे यांनी दिलेल्या पत्रामध्ये म्हटले आहे. मी २०१९ ची माढा विधानसभेची निवडणूक धनुष्यबाण चिन्हावरती लढवली होती. शिवसेना पक्ष सत्तेत असताना देखिल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने आमच्या कुठल्याही कामांना मंजुरी मिळू दिली नाही. या अशा अनेक घटनांचा परिपाक म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यशस्वी बंड करून सत्ता स्थापन केली.

आम्हालाही आनंद झाला. आता आमची कामे मंजूर होतील. आम्हाला कोणीतरी विचारेल असे वाटले परंतु यात कुठलाही बदल झालेला नाही. मुख्यमंत्र्यांनी मी सुचवलेल्या कामांना मंजुरी देण्याबाबत आदेश दिले होते.

मींही आपणास जिल्ह्यात आल्यावर टेंभुर्णी येथे स्वागत करून विकास कामांची सूची दिली होती. त्यातील कुठल्याही कामास अद्याप तरी मंजुरी मिळालेली नाही. तसेच माढा विधानसभेची निवडणूक मी लढवल्यामुळे सहाजिकच ६ टक्के विकास कामे, ६० टक्के शासकिय कमिट्यावर माझ्या सूचनेनुसार होणे उपेक्षित आहे. परंतु अद्याप पर्यंत कुठल्याही कार्यवाही झाली नाही. तरी माढा विधानसभा मतदारसंघातील कामे मंजूर करत असताना माढा तालुक्यातील शासकिय कमिट्यांचे गठन करत असताना माझ्या सूचनेचा अग्रक्रमाने विचार करावा या गोष्टींची मी वाच्यता जाहीरपणे केल्यास त्याचा परिणाम बाळासाहेबांची शिवसेना व भारतीय जनता पार्टी यांचे युतीवर होण्याची शक्यता असल्याचे मत व्यक्त केले आहे.

# सिध्देश्वर यात्रेनिमित्त आज होम मैदानावर लेझर शो

✔ सुराज्य/सोलापूर



श्री सिध्देश्वर देवस्थान पंच कमिटीच्यावतीने आज सोमवारी रात्री आठ वाजता होम मैदानावर ग्रामदैवत शिवयोगी श्री सिध्देश्वर यात्रेनिमित्त शोभेच्या दारूकामाची आतषबाजी आणि लेझर शो चे आयोजन केले आहे.

पन्नास बाय चाळीस फूट अशा भव्य पडद्यावर लेझर शो दाखवण्यात येणार असून, या लेझर शोमध्ये बालयोगी श्रीसिध्दरामेश्वरांचा जन्म, श्री मल्लय्यांनी श्री सिध्दरामेश्वरांच्या हातून हुरडा खाताना‌चा प्रसंग, श्रीशैल पर्वतावरील श्री मल्लिकार्जुन यांच्याकडून श्री सिध्दरामेश्वरांनी घेतलेली दीक्षा, श्री मल्लिकार्जुन व श्री सिध्दरामेश्वर यांच्या झालेला दैवी संवाद व श्री सिध्दरामेश्वरांनी सोन्नलगीमध्ये म्हणजे आजच्या सोलापूरमध्ये केलेले कार्य अशा अनेक गोष्टींवर लेझर शोमधून माहिती दिली जाणार आहे. या कार्यक्रमास भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन श्री सिध्देश्वर देवस्थान पंच कमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांनी केले आहे.



## बी.एड. परीक्षेत मोनिका यन्नम; धनश्री कोठे यांचे यश


✔ **सोलापूर** : संभाजीराव शिंदे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय व संभाजीराव शिंदे अध्यापक विद्यालयाच्या वतीने बी.एड. परीक्षेत यश मिळवणाऱ्या मोनिका रमेश यन्नम (प्रथम क्रमांक), राजमाबी बंदेनवाज शेख (द्वितीय क्रमांक) व धनश्री राजेश कोठे (तृतीय क्रमांक) यांचा स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमासाठी ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. ह.ना.जगताप हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर संस्था सदस्या डॉ.राधिका चिलका, प्राचार्या डॉ.विणा कणबसकर, मुख्याध्यापिका रोहिणी सुरा, रमेश यन्नम यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. जगताप यांनी विद्यार्थ्यांना शिक्षण क्षेत्रातील संधी व आव्हाने या विषयी मार्गदर्शन केले. प्रा. शेखर कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा.प्रशांत चाबुकस्वार यांनी पीएच.डी. पदवी संपादन केल्याबद्दल त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी प्रा. मंदाकिनी आसबे, प्रा.रेखा बन्ने, प्रा. ज्ञानेश्वर कांबळे, प्रा. लता गायकवाड, कु.श्रेया नंदी, अनिल नडीमेटला विद्यार्थिनींची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाती कोळी यांनी केले तर आभार प्रा. स्मिता गोणे यांनी मानले.




## शक्तीचा जागर करताना सन्मानही केला पाहिजे : डॉ. फडणवीस

✔ **सोलापूर** : आज अर्थाने स्त्रीचा जागर होत असताना त्यांचा सन्मान देखिल केला जात आहे. आज स्त्रिया कुठेही कमी पडताना दिसत नाहीत या सर्व विद्यार्थीनी क्रिडा क्षेत्रामध्ये आपले नांव जागतिक पातळीवर उज्ज्वल करत देशाची मान उंचावतील अशी अपेक्षा कुलगुरू मृणालिनी फडणवीस यांनी व्यक्त केली. मराठा समाज सेवा मंडळाच्या तीळगुळ समारंभामध्ये शिवतीर्थ पुरस्कार प्रदान पार पडला यावेळी त्या बोलत होत्या यावेळी व्यासपिठावर प्रमुख पाहुणे ह.भ.प. बापुसाहेब मोरे महाराज-देहूकर , अध्यक्ष माजी महापौर मनोहर सपाटे प्रा. महेश माने, विनायकराव पाटील, नामदेव थोरात, महादेव गवळी, शिवदास चटके, प्रभाकर खंडाळकर, शहाजी सुर्वे, अशोक चव्हाण, सुर्यकांत इंगळे आदि मान्यवर उपस्थित होते. जलतरणपटू किर्ती भराडीया, लाठी-काठीपटू गार्गी चव्हाण, राष्ट्रीय तायक्वांदोपटू मुस्कान शेख, कराटेपटू भुवनेश्वरी जाधव, आर्चरीपटू श्रेया परदेशी व तनिष्का ठोकळ यांचा समाजभूषण शिवतीर्थ पुरस्कार प्रदान गौरव करण्यात आला.यावेळी बबन सपाटे, भागवत मोरे, सुनिता साळुंके, रेखा सपाटे, डॉ. अनिल बारबोले, डॉ. मधुकर पवार, राजेंद्र शिंदे, सचिन गायकवाड, देवेंद्र मदने, सुजाता जुगदार, देवेंद्र आदमाने, महानंदा सोलापुरे, उषा गोकळे, दत्त , तानाजी माने, सुरेश जाधव, भावना गुंफेकर, अर्चना साबळे, सुजाता पवार, राखी दिक्षीत, रेखा शिंदे आणि उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सारिका पंडीत यांनी केले तर आभार ज्ञानेश्वर सपाटे यांनी मानले.

## दशरथ लोकरे यांचे निधन



✔ **माढा** : शिराळ (टेंभूर्णी) येथील दशरथ विठोबा लोकरे (वय ९८ वर्षे) यांचे रविवारी (ता.१५) वृद्धापकाळाने निधन झाले. जलसंपदा खात्यातून निवृत्त झालेले दादासाहेब लोकरे यांचे वडील होते. त्यांच्या पश्चात सहा मुले, दोन विवाहित मुली, सुना, नातवंडे, परतवंडे असा मोठा परिवार आहे.



## आरोग्य तपासणीच्या उपक्रमातून पत्रकारांच्या आयुष्याला उभारी : आ.कल्याणशेट्टी

✔ सुराज्य/सोलापूर

धकाधकीच्या, दगदगीच्या आणि ताणतणावाच्या जीवनात पत्रकारांना स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष द्यायला वेळ नसतो. त्याचा विचार करून जुनैदी नर्सिंग होमच्या माध्यमातून राबविण्यात आलेले मोफत आरोग्य तपासणी शिबीर पत्रकारांच्या आयुष्याला ख-या अर्थाने उभारी देणारे ठरेल, असा भाजपचे जिल्हाध्यक्ष तथा अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी यांनी व्यक्त केला आहे.

मराठी पत्रकार दिन आणि मकर संक्रांतीचे औचित्य साधून रविवारी, शिवछत्रपती रंगभवन येथील जुनैदी नर्सिंग होम आणि सोलापूर श्रमिक पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी आमदार कल्याणशेट्टी बोलत होते. याप्रसंगी जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे आणि श्री सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ.अ.हाफिज जुनैदी यांनी स्वागत तर सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे यांनी प्रास्तविक केले. यावेळी आमदार कल्याणशेट्टी यांनी शारीरिक व मानसिक आरोग्याच्या दृष्टीने पत्रकारांपेक्षाही राजकारण्यांची त-हा तर निराळीच असल्याचे सांगून त्यांच्या जीवनशैलीचा तर कुठलाच ताळमेळ नसल्याचे नमूद केले. जिल्हाधिकारी शंभरकर यांनी,आरोग्य ही संपदा आणि संपत्ती आहे, ती अशीच मिळत नसल्याचे सांगून जोपर्यंत जीवनशैलीत आपण बदल घडवून आणणार नाही, तोपर्यंत आरोग्यपूर्ण जीवन मिळणार नसल्याचे मत व्यक्त केले.

पोलीस अधीक्षक सरदेशपांडे व धर्मराज काडादी यांनीही पत्रकारांच्या आरोग्याचा विषय जिव्हाळ्याचा असल्याचे मत मांडले. यावेळी पुरस्कारप्राप्त पत्रकारांना शाल, सन्मानपत्र आणि भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. याचवेळी मकरसंक्रांतीनिमित्त तीळगूळ समारंभ पार पडला. या शिबिरात पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांच्या आरोग्याची तपासणी डॉ. अ. हाफिज जुनैदी, डॉ. अजीम जुनैदी, डॉ. जुवेरिया तनझीर जुनैदी, डॉ.समरीन जुनैदी केली. तर समतोल आहाराबाबत आहारतज्ज्ञ तबस्सूम शेख यांनी मार्गदर्शन केले.

या शिबिराचा शंभराहून अधिक पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांनी लाभ घेतला. यावेळी जुनैदी नर्सिंग होमचे मार्गदर्शक डॉ. अ. गफूर जुनैदी, व्यवस्थापक तौसिफ शेख, शाहनूर शेख यांच्यासह हॉस्पिटलचे कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन दत्ता थोरे यांनी केले तर आभार पत्रकार संघाचे सरचिटणीस समाधान वाघमोडे यांनी मानले.

## जुना विजापूर नाका येथे दुचाकीच्या धडकेने पादचारी ठार

✔ **सोलापूर** :रस्ता क्रॉस करताना मोटार सायकल धडक दिल्याने चाळीस वर्षीय पादचारी इसम गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात जुना विजापूर नाका येथील दक्षिण मुखी मारुती मंदिरासमोर शनिवारी सायंकाळच्या सुमारास घडला. सुखदेव नवलू पवार (वय ४० रा.चैतन्य नगर,पारधी कॅम्प, विजापूररोड) असे मयताचे नाव आहे. काल शनिवारी सायंकाळी सात वाजेच्या सुमारास ते दक्षिणमुखी मारुती मंदिरासमोरून पायी रस्ता क्रॉस करीत होते. त्यावेळी एमएच१३-डीएल-२२३८ या दुचाकीच्या धडकेने ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना शासकिय रुग्णालयात दाखल केले असता ते उपचारापूर्वी पूर्वी मयत झाले. या अपघाताची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली आहे.

## दुचाकी पळवली

✔ **सोलापूर** : हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एम.एच.१३.बी.एक्स.०६८२ हि ७ जानेवारी रोजी म्हेत्रे नगर एमआयडीसी रोड येथे पार्क करून ठेवली होती.त्यावेळी अज्ञात चोरट्याने ही दुचाकी चोरून नेली आहे.या प्रकरणी राकेश रघुनाथ ईद्दम (वय-२८,रा.म्हेत्रे नगर, एमआयडीसी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.


















## वेळापूर येथे रिपाइंतर्फे जिजाऊ जयंती साजरा

✔ सुराज्य/वेळापूर : येथील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले संपर्क कार्यालय या ठिकाणी सालाबादप्रमाणे याहीवर्षी छत्रपती शिवरायांच्या मनामध्ये स्वराज्याची ज्योत प्रज्वलित करणाऱ्या राजमाता माँ जिजाऊ यांची जयंती साजरी करण्यात आली. तसेच पत्रकार दिनानिमित्त पत्रकार बांधवांचेही सत्कार यावेळी करण्यात आले. प्रतिमेचे पूजन वेळापूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश बागाव, सोलापूर जिल्हा नियोजन समिती सदस्य उत्तमराव जानकर पीएसआय संजय राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच पत्रकार दिलीप बनसोडे, महादेव जाधव, किरण जाधव, विठ्ठल वाघे यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी रिपाइं युवक जिल्हा कार्याध्यक्ष किरण धाईंजे विद्यमान सरपंच रजनीश बनसोडे, रिपाइं माळशिरस तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे, रिपाइं युवक तालुकाध्यक्ष दशरथ नवगिरे, राजाभाऊ शिंदे तालुका उपाध्यक्ष, रामभाऊ कांबळे, बोंडले उपसरपंच तालुका उपाध्यक्ष महेंद्र लोंढे, तालुका मार्गदर्शक प्रा. भास्कर बनसोडे, ग्रा. पं. सदस्य रायचंद खाडे, ग्रा. पं. सदस्य हनुमंत वायदंडे, एस. सी. मोर्चा तालुका सरचिटणीस अजित साठे, भागवतराव गायकवाड, उमेश पोरे, अमोल पनासे, तानाजी जगदाळे, संजय देशपांडे, संदीप माने देशमुख, विनायक माने, हनुमंत सस्ते ,अशोकभाऊ बनसोडे, दिलीप भोसले, भाऊसाहेब चोरमले, गणेश साठे, शहराध्यक्ष शरद साबळे, दादासो माने, रणजित सरवदे, जवान माने दे, अण्णा बनसोडे, रोहित कांबळे, दीपक आयरे, विश्वतेज सरतापे इत्यादी उपस्थित होते. प्रास्ताविक आभार मिलिंद सरतापे यांनी केले तर सूत्रसंचालन रणजित सरवदे यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन आरपीआय आठवले माळशिरस तालुका, वेळापूर शहर यांच्यावतीने करण्यात आले होते.



## जिल्हा नियोजन समिती सदस्यपदी निवडीबद्दल पाटील यांचा सत्कार

✔ सुराज्य/पिलीव : भाजपचे महाराष्ट्र कार्यकारीणी सदस्य तथा सोलापूर जिल्हा सहप्रभारी तथा माजी पंचायत समिती सदस्य के. के. पाटील यांची सोलापूर जिल्हा नियोजन समिती सदस्यपदी निवड झाल्याबद्दल कुसमोड गावचे सरपंच तुषार लवटे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कुसमोडचे माजी उपसरपंच संजय पाटील, लक्ष्मण पवार, सुभाष जाधव यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना के. के. पाटील यांनी कुसमोड गावच्या विकास कामांना सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे यावेळी सांगितले.

## कुसमोड येथील लक्ष्मीनगर शाळेचे आज स्नेहसंमेलन

✔ सुराज्य/पिलीव : माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील जि. प. प्राथमिक शाळा लक्ष्मीनगर शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन १६ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता सदगुरु श्रीश्री सद्‌गुरु साखर कारखान्याचे चेअरमन एन शेषागिरीराव, निमगाव गटाच्या जि. प. सदस्या ज्योती पाटील, पिलीव गटाचे जि. प. सदस्य गणेशदादा पाटील, माळशिरस पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी धनंजय देशमुख, केंद्रप्रमुख राजकुमार फासे, कुसमोडचे सरपंच तुषार लवटे, सर्व आजी माजी ग्रामपंचायत सदस्य, पिलीव केंद्रातील सर्व शिक्षक, आजी माजी विदयार्थी, शाळा व्यवस्थापन समिती सर्व सदस्य, अंगणवाडीमधील विद्यार्थी यांच्या उपस्थितीत आयोजित केला असल्याचे मुख्याध्यापक सुहास कोल्हे यांनी सांगितले. या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन पत्रकार व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रा. संजय पाटील यांनी केले आहे.

## श्री सद्‌गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज जन्मोत्सवाचे आयोजन

✔ सुराज्य/श्रीपूर : श्रीपूर हनुमान मंदिर तालुका माळशिरस येथे श्रीराम भक्त मंडळ श्रीपूर यांच्यावतीने श्री सद्‌गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलकर महाराज जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या जन्मोत्सवांमध्ये भजन, किर्तन, प्रवचन, सामुदायिक नाम जप, काकड आरती इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ३१ जानेवारी रोजी सायं. ७ गणपती पूजन, सायं. ७.३० ते ९.३० हभप जयंतराव वामन कुलकर्णी भोसरी यांचे किर्तन, दि. १ फेब्रुवारी रोजी सायं. ७ ते ९ हभप स्मिता अजेगावकर पुणे यांचे नारदीय किर्तन व दि. २ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते ११ यांचे जन्माचे किर्तन होणार असून यानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप केले जाणार आहे. तसेच दि. ३१ जानेवारी २०२३ ते २ फेब्रुवारी पर्यंत दीपोत्सव कार्यक्रम होणार आहे. उपस्थित राहावे, असे आवाहन हरिभाऊ कुलकर्णी, हरिभाऊ वसेकर, श्रीनिवास मार्डीकर व तुकाराम केसकर यांनी केले आहे.

## दत्तपंथी सोंगी मंडळाच्यावतीने बहारदार भजनाचा कार्यक्रम

✔ सुराज्य/अक्कलकोट : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेल्या स्वामी कार्याने प्रभावित होवून सालाबादाप्रमाणे मकरसंक्रांत निमित्त न्यासाच्या महाप्रसादासमोरील प्रांगणात कोल्हापूर येथील शिवाजीपेठ मरगाई गल्ली दत्तपंथी सोंगी मंडळाच्यावतीने बहारदार भजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. स्वामीभक्तांनी भरभरुन साथ दिली. या भजन सेवा कार्यात कोल्हापूरचे शैलेश जाधव, सुनिल राऊत, सुनिल शिंदे, सुनिल दळवी, संजय गवळी, जयसिंग धारेकर, अजिंक्य म्हसवेकर, आकाश सुतार, रमेश माने, स्वप्नील माने, रविंद्र कांबळे, संग्राम पाटील, स्वप्नील तुपारे यांनी भाग घेतला. यावेळी मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, पुरोहित अप्पू पुजारी, सिद्धाराम कल्याणी, एस.के.स्वामी, बाळासाहेब पोळ, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, बाळासाहेब घाडगे, दत्ता माने, निखिल पाटील, प्रसाद हुल्ले, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय

# गावच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही

## विकासकामांचा शुभारंभ करताना दीपकआबा-शहाजीबापूंची ग्वाही

✔ सुराज्य/सांगोला

सांगोला तालुक्याचा विकास हाच आमचा ध्यास आहे. मागील ५० वर्षात जो विकास झाला नाही तो येत्या काळात करून दाखवायचा आहे, याकरिता ग्रामस्थांचे सहकार्य महत्त्वाचे आहे. मागील दोन अडीच वर्षाच्या काळात ७०० ते ८०० कोटी रुपयांचा निधी सांगोला तालुक्याला मिळाला आहे. येत्या काळात अजून मोठा निधी उपलब्ध करून देऊ आणि तालुक्याचा सर्वांगीण विकास करू असे सांगत, गावच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी कोणत्याही परिस्थितीत निधी कमी पडू देणार नाही तसेच या गावच्या विकासासाठी आम्ही कटिबद्ध असल्याचे आम. शहाजीबापू पाटील व माजी आम. दिपकआबा साळुंखे पाटील यांनी सांगितले.

मांजरी ग्रामपंचायत अंतर्गत विविध विकास कामांचा शुभारंभ तथा उदघाटन समारंभ आम. शहाजीबापू पाटील व माजी आम. दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या हस्ते झाला. या कार्यक्रमासाठी भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष चेतनसिंह उर्फ बाळासाहेब केदार सावंत, शिरभावी गावचे माजी सरपंच अभिजीतदादा नलवडे, शिवने ग्रामपंचायतचे लोकनियुक्त सरपंच दादासाहेब घाडगे, धायटी ग्रामपंचायत सदस्य गणेश कदम, यांच्यासह ग्रामपंचायत सरपंच सौ. मंगल मधुकर भुसे, उपसरपंच श्रीम. कौशल्या वसंत कांबळे यांच्यासह गावातील ज्येष्ठ नागरिक आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामपंचायत



आजी-माजी सदस्य- सदस्या, पोलीस पाटील, तंटामुक्त समितीचे आजी-माजी पदाधिकारी गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मकर संक्राती सणांचे औचित्य साधून मांजरी ग्रामपंचायत व आबा- बापू गटाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते निराधार महिलांना आपुलकीची साडी देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष चेतन सिंह केदार यांनी आपल्या मनोगतात निधी देण्यासाठी आम्ही प्रयत्न करू, गावच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी सहकार्य करू असे सांगितले यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी सरपंच भाऊसाहेब जगताप यांनी केले दरम्यान माजी सरपंच अशोक शिनगारे यांनी मागण्या मांडल्या. तर माजी सरपंच अमृत उबाळे, सचिन शिनगारे यांनी मागण्यांचे निवेदन लोकप्रतिनिधी यांना दिले.

## मध्यप्रदेश मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रा. मिलिंद जोशी

✔ सुराज्य/सोलापूर :

मराठी साहित्य अकादमी भोपाळ आणि मध्यप्रदेश मराठी साहित्य संघ भोपाळ यांच्यावतीने आयोजित ९ व्या प्रांतीय मध्यप्रदेश मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी सोलापूर जिल्ह्यातील बार्शीचे प्रसिद्ध लेखक, वक्ते आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांची निवड करण्यात आली आहे. हे संमेलन १६ आणि १७ जानेवारी रोजी इंदूरच्या प्रीतमलाल दुआ सभागृहात होणार आहे. या संमेलनाचे उदघाटन मध्यप्रदेश सरकारच्या सांस्कृतिक मंत्री उषा ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे. या संमेलनात ग्रंथप्रदर्शन, कवि संमेलन, परिसंवाद, पुस्तक प्रकाशन असे विविध कार्यक्रम होणार आहेत. मुक्ता बर्वे आणि



सहकलावंत प्रिय भाई एक कविता हवी' आहे हा कार्यक्रम सादर करणार आहेत. गोष्ट नर्मदालयाची' या पुस्तकाच्या लेखिका प्रवाजिका, विशुद्धानंदा (भारती ठाकूर) यांची प्रकट मुलाखत होणार आहे. ढासळती मानवी मूल्ये आणि संत साहित्याची गरज या विषयावर प्रा. मिलिंद जोशी यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद होणार असून त्यात प्रशांत पोळ (जबलपूर), उदय परांजपे (भोपाळ) आणि दीपक खरे (इंदूर) सहभागी होणार आहेत.

## माजी सैनिकांच्या सेवेसाठी कटिबद्ध : आ. देशमुख

### सैनिक मित्र पुरस्काराचे थाटात वितरण

सोलापूरः माजी सैनिकांनी देशासाठी जीवाची पर्वा न करता कार्य केलेले असते म्हणूनच त्यांच्या सेवेसाठी मी कटिबद्ध आहे, असे भावोद्‌गार आमदार सुभाष बापू देशमुख यांनी काढले.

भारतीय माजी सैनिक संघटनेच्या सैनिक मित्र पुरस्कार वितरण प्रसंगी ते मार्गदर्शन करीत होते. अध्यक्षस्थानी से. नि. ब्रिगेडियर विजय निशानदार होते. तर प्रमुख अतिथी म्हणून मेजर एस. एस खांडेकर हे होते.

याप्रसंगी आ. सुभाष देशमुख, उद्योजक राम रेड्डी, बांधकाम व्यवसायीक संजय पटेल, आकाशवाणी अधिकारी राजेंद्र दासरी, ज्येष्ठ कवी देवेंद्र औटी ॲड. अंबाजी रायनी यांना सैनिक मित्र पुरस्काराने गौरवित करण्यात आले. प्रास्ताविक संघटनेचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष व जिल्हाध्यक्ष अरुण कुमार



तळीखेडे यांनी केले.

याप्रसंगी देवेंद्र औटी यांनी सोलापूरसारख्या महत्त्वाच्या आणि हुतात्म्यांच्या या शहरात सैनिकांचे स्मारक असण्याची आवश्यकता आहे. युवा पिढीला सैन्यामध्ये जाण्यासाठी ते प्रेरणास्थान ठरेल, असे मत व्यक्त केले. उद्योजक राम रेड्डी यांनी पुलवामाच्याप्रसंगी ५० लाख रुपयांची देणगी दिली.

याबद्दल मेजर खांडेकर यांनी त्यांचे आभार व्यक्त केले. आकाशवाणीचे अधिकारी राजेंद्र दासरी यांनी सैनिकांच्या कार्याची मुक्तकंठाने प्रशंसा करीत आकाशवाणीवरून आम्ही अनेकांच्या मुलाखती घेऊन प्रोत्साहन दिले आहे. यापुढेही देत राहु, असे मत व्यक्त केले.

ॲड. अंबाजी रायनी यांनी माजी सैनिकांसाठीच्या सवलतीचा आढावा घेतला. सूत्रसंचालन दुधगेकर यांनी केले. अध्यक्ष भाषणातून से. नि. ब्रिगेडीयर विजय निशानदार यांनी सैनिकांच्या एकूणच जीवनावर प्रकाश टाकला.

## चिखलीत मकर संक्रांत उत्साहात

✔ सुराज्य/चिखली :

तिळगूळ घ्या... गोड गोड बोला' असा स्नेहमय संदेश देत एकमेकांना तिळगुळाचे वाटप करीत पारंपरिक पद्धतीने मोहोळ तालुक्यातील चिखली, हिवरे, यावली या भागात मकर संक्रांत उत्साहात साजरी करण्यात आली.

रविवारी दि. १५ रोजी मकर संक्रांत निमित्त सकाळपासूनच प्रत्येकाच्या घरी लगबग पाहावयास मिळाली.

बालचमूंनी थोरामोठ्यांचा आशीर्वाद घेत व मित्रांना तिळगूळ देत आनंद लुटला. नागरिकांनी, युवक-युवतींनी एकमेकांना एसएमएसद्वारे मकर संक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या.

शिवाय व्हॉट्सप, फेसबुक अशा सोशल मीडियाद्वारेही संदेशांची देवाण-घेवाण झाली. महिलांनी या दिवशी पारंपरिक पद्धतीने विशेष पोशाख परिधान केला होता. या भागातील महिलांनी आपआपल्या भागात असणाऱ्या ग्रामदेवतेच्या मंदिरात जाऊन दर्शन घेतले.



## माढा येथे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर : आ. शिंद

✔ सुराज्य/टेंभुर्णी :

विठ्ठलराव शिंदे बहुउद्देशीय सांस्कृतिक मंडळ, निमगांव टे. व माढेश्वरी अर्बन डेव्ह. को. ऑप बँक लि. माढा यांचे सहयोगातून खा. शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त दि. ८ ते १२ फेब्रुवारी या कालावधीत सन्मती नर्सिंग होम, माढा येथे मोफत नेत्रचिकित्सा व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आमदार बबनराव शिंदे यांनी दिली.

विठ्ठलराव शिंदे बहुउद्देशीय सांस्कृतिक मंडळ, निमगांव टे. व माढेश्वरी अर्बन डेव्ह. को. ऑप बँक लि. माढा यांचे सहयोगातून प्रतिवर्षी खासदार शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. दि. ८ ते १२ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत जागतिक किर्तीचे नेत्रतज्ञ पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने व डॉ. रागिनी पारेख, सर जे. जे. रूग्णालय, मुंबई यांच्या अधिपत्याखाली माढा येथे मोफत नेत्रचिकित्सा व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये दि. ८ फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषद प्रशाला, माढा येथे नेत्ररूग्णांची तपासणी होणार आहे. त्यानंतर ९ ते ११ फेब्रुवारी दरम्यान मोतीबिंदू शस्त्रक्रिया व १२ रोजी मोतीबिंदू शस्त्रक्रिया झालेल्या रूग्णांची तपासणी व कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

या शिबिराचे नियोजनासाठी माढेश्वरी बँकेचे पदाधिकारी व अधिकारी, शासकीय आरोग्य विभागाचे संबंधित अधिकारी यांची आढावा बैठक विठ्ठलराव शिंदे कारखान्यावर मंगळवार १७ जानेवारी रोजी होणार आहे.

> सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून सन २००६पासून या शिबिराचे आयोजन माढा येथे करण्यात येत असून आजअखेर २२ हजार नेत्ररूग्णांची तपासणी करून १२ हजार नेत्र रूग्णांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. शिबिरात रूग्णांची राहण्याची व जेवणाची व्यवस्था करण्यात येत असून रूग्णांना चष्मे व औषधे मोफत पुरविण्यात येत आहेत. शिबिराच्या माध्यमातून अनेक गरजू वयोवृध्द रूग्णांना दृष्टी प्राप्त झालेली आहे.
>
> **- आ. बबनराव शिंदे.**

## पर्यावरण परवानगी घेऊनच खडीक्रशर, दगडखाणी उत्खनन करा

### पालकमंत्र्यांचा खाण मालकांना आदेश

✔ सुराज्य/सोलापूर

**खडीक्रशर व दगडखाणपट्ट्याचा विषय राष्ट्रीय हरित लवादाच्या क्षेत्रात आहे. न्यायालयीन प्रकरण असल्याने खडीक्रशर धारक व दगडखाणपट्टा धारकांनी नियमानुसार पर्यावरण अनुमती घेऊनच उत्खनन करा असे आदेश राज्याचे महसूल, पशूसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिले.**

खडीक्रशरधारक व दगडखाणपट्टा धारकांनी यांनी केलेल्या विनंतीनुसार नियोजन भवन सभागृहात पालकमंत्री राधाकृष्ण विखे - पाटील यांनी त्यांच्या मागण्या जाणून घेतल्या. यावेळी आ. सुभाष देशमुख, समाधान आवताडे, बबनदादा शिंदे , राजेंद्र राऊत, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, अपर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे, जिल्हा गौण खनिज अधिकारी दिव्या वर्मा उपस्थित होते. यावेळी जिल्ह्यातील खडीक्रशर धारक व दगडखाणपट्टा धारकांनी खाणी पुन्हा सुरू करण्याची मागणी केली व दंड माफ करण्याची मागणी केली.

तसेच रॉयल्टी भरण्याची तयारी दर्शविली. तसेच अन्य जिल्ह्यांप्रमाणे अल्प मुदत ५००, १०००, २००० ब्रास खनिज उत्खनन करण्याची परवानगी द्यावी अशी मागणी केली. यावर पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी न्यायालयीन प्रकरण असल्याने खडीक्रशरधारक व दगडखाणपट्टाधारकांनी नियमानुसार पर्यावरण अनुमती खाणी चालवावी.

अल्पमुदतीच्या गौण खनिज परवाना प्रक्रियेबाबत अन्य जिल्ह्यांनी काढलेल्या परिपत्रकाचे तसेच निर्गमित केलेल्या आदेशांचे आणि परवानग्यांचे अवलोकन करून जिल्हाधिकाऱ्यांनी पुढील कार्यवाही करावी अशा सूचना दिल्या तर खाणपट्टा धारकांनी लवकरात लवकर सर्व प्रकारच्या अटींची पूर्तता करून पर्यावरणविषयक परवानग्या मिळवण्याचे प्रयत्न करावे, अशा सूचना केल्या.

भविष्यातील कोणत्याही प्रकारच्या कारवाया टाळण्याच्या दृष्टीकोनातून अधिकाधिक कायदेशीर बाबींचे पालन करणे महत्त्वाचे असल्याची गरज विखे - पाटील यांनी यावेळी प्रतिपादित केली.

## जेऊर येथे २२ एप्रिलला श्री काशीलिंग सामुदायिक विवाह

✔ सुराज्य/अक्कलकोट

जेऊर (ता. अक्कलकोट) येथे श्री काशीलिंग बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने शनिवार ता. २२ एप्रिल रोजी सायंकाळी ६:४५ वाजता अक्कलकोट रोडवरील श्री स्वामी समर्थ सांस्कृतिक भवन जेऊर येथे सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आली असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष तथा जिल्हा परिषद माजी कृषी सभापती मल्लिकार्जुन पाटील यांनी दिली आहे.

यावेळी काशी जगद्‌गुरू डॉ. मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामी, खासदार डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी, श्री शिवकुमार महास्वामी, श्री जडेय शांतिलिंगेश्वर महास्वामी, श्री शिवानंद शिवयोगी महास्वामी, श्री बसवलिंग शिवयोगी महास्वामी, शिवयोगी शिवाचार्य महास्वामी, निलकंठ शिवाचार्य महास्वामी, श्रीकंठ शिवाचार्य महास्वामी, राजशेखर शिवाचार्य महास्वामी, मळेंद्र महास्वामी, श्री अभिनव बसवलिंग महास्वामी, शांतलिंग शिवाचार्य महास्वामी, महानंदा मुगळी, सोमलिंग घुळी महाराज, सद्‌गुरू पांडुरंग महाराज, पिरजादे बाबा, कुंभार मठ, मादन हिप्परगा, इब्राहिमपूर आदी मठाधीश उपस्थित राहणार आहेत.

याचवेळी अक्कलकोट तालुक्यातील रहिवाशी परंतु सध्या देशाच्या विविध भागातील सीमेवर देश रक्षण करीत असलेल्या सैनिक बांधवांचा सन्मान सोहळादेखील होणार आहे. ग्रामीण भागात सतत पडणाऱ्या दुष्काळामुळे आर्थिक अडचण तसेच वाढत



चाललेली प्रचंड महागाई यामुळे नागरिकांना आपल्या मुलामुलींची लग्ने लावणे आणि त्याची जबाबदारी हे खूपच खर्चिक आणि न झेपणारे ठरत आहे.

श्री काशीलिंग देवस्थान ट्रस्ट व बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने यंदा जेऊरला कोरोनाकाळ वगळता सलग ६ व्यावर्षी सामुदायिक विवाह सोहळा आयोजिला जात आहे. या संस्थेत एकूण २०० मित्रपरिवार सदस्य एकत्र येऊन तन, मन धनाने योगदान देत आहेत. काशीलिंग बहुउद्देशीय संस्थेच्या मल्लिकार्जुन पाटील व मित्रपरिवारांकडून ४ वर्षात १३४ जोडपे विवाहबद्ध झाली आहेत .

या विवाह सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात येत आहे. दरवर्षी साधारण पन्नास हजार वऱ्हाडी उपस्थित राहत असतात. या विवाह सोहळ्याचे नियोजन काशीलिंग देवस्थान ट्रस्ट व काशिलिंग बहुउद्देशीय संस्था तसेच कार्यकर्ते व ग्रामस्थ मंडळी जेऊर हे करीत आहेत.

याचवेळी अक्कलकोट तालुक्यातील पत्रकार बांधवाचा देखील पत्रकार दिनाचे औचित्य साधत सन्मान करण्यात आला.

या पत्रकार परिषदेस मल्लिकार्जुन पाटील, शिवाजीराव कलमदाणे, उपसरपंच काशिनाथ पाटील, सुरेश सोनार, काशिनाथ कवठे, शिवनिंगप्पा पत्रिगीडा, काशिनाथ रामपुरे, इरण्णा कणमुसे, अंबाराया कनोजी, शिवराज स्वामी, इरप्पा कोळी, शिवराज बोरिकरजगी, मल्लीनाथ चौलगी, सिद्धाराम कापसे, मल्लिनाथ करपे, रमेश गोगावे, काशिनाथ कापसे, मल्लिनाथ मणुरे, महेशकुमार चानकोटे, सिद्धाराम बामणे, शिवपुत्र चौलगी, सिद्धाराम चौधरी, बसवराज वग्गे, रवी स्वामी आदींची उपस्थिती होती.

> **तालुक्यातील कार्यरत सैनिकांचा होणार सन्मान**
>
> आपले कुटुंब सोडून हजारो किलोमीटर दुर राहून आपल्या देशासाठी लढत असलेल्या अक्कलकोट तालुक्यातील सध्या सीमेवर कार्यरत असलेल्या सैनिकांचा अभिमान बाळगून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधत त्यांचा सन्मान सामुदायिक विवाह सोहळ्याच्या निमित्ताने केला जाणार आहे.



## नातेपुते येथील बाजार समिती येथे सहकार महर्षी यांची जयंती साजरी

**नातेपुते** : अकलूज कृषि उत्पन्न बाजार समितीचे संस्थापक सहकार महर्षि शंकरराव नारायणराव मोहिते-पाटील यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त दुय्यम बाजार पेठ नातेपुते येथे बाजार समितीचे संचालक तथा सोलापूर जि.प. चे माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख यांचे शुभहस्ते सहकार महर्षिंच्या पुतळ्याचे विधीवत पुजन करण्यात आले. कार्यक्रमासाठी बाजार समितीचे उपसभापती जननायक मामासाहेब पांढरे, संचालक केशव कदम,बाहुबली चंकेश्वरा,जयराम कर्चे, तसेच नातेपुते येथील प्रतिष्ठीत मा.धैर्यशीलभाऊ देशमुख,अमरशील देशमुख,नगराध्यक्षा उत्कर्षाराणी पलंगे, माजी सरपंच सौ.सुरेखाताई उराडे, सौ.अंजना लोंढे सरपंच लोंढेमोहितेवाडी,विलास काळे, साहेबराव देशमुख, उमेश पलंगे,नंदकुमार लांडगे, पोपट लोंढे,श्रीकांत बावीसकर,सुरज चांगण,माणिक लांडगे,कैलास सोनवणे,रोहित ईटकर बाजार समितीचे व्यापारी वज्रकुमार चंकेश्वरा, निलकुमार गांधी, महावीर गांधी,चंद्रशेखर शेटे, शैलेश गांधी, हमाल व तोलार दत्तु बरडकर,अमोल बोधले,सोमनाथ ननवरे,खरेदी विक्री संघाचे मॅनेजर मोहन पानसकर शिवशंकर बझारचे शाखा मॅनेजर नितीन कुंभार व तसेच सुपर मार्केट गाळेधारक ,सामाजीक कार्यकर्ते, पत्रकार व बाजार समितीचे उपसचिव चंद्रकांत अडगळे, लिपीक विजय पाटील, अजय जाधव, प्रज्योत लोंढे, ओंकार इंगोले, शिपाई हणमंत रूपनवर, गोरख डोईफोडे, बाळू बडे,नानासाहेब रणदिवे,औदुंबर तिवारी इ. कर्मचारी व आजी माजी कर्मचारी कार्यक्रमास बहुसंखेने उपस्थित होते.



## मळोली येथे सहकार महर्षी शंकरराव मोहिते- पाटील जयंती साजरी

**वेळापूर** : सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या जयंतीनिमित्त मळोली येथे शिवशंकर विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या वतीने सहकार महर्षींच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यावेळी शिवशंकर विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन शेषांक भैया पाटील, माजी व्हा. चेअरमन महादेवराव जाधव सर्व संचालक व ज्येष्ठ नागरिक यावेळी उपस्थित होते यावेळी तज्ञ संचालक जगन्नाथ जाधव व ज्येष्ठ नेते शिवाजीराव जाधव यांच्या हस्ते काकासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले, या कार्यक्रमा प्रसंगी मळोली गावचे माजी उपसरपंच व भारतीय जनता पक्षाचे तालुका उपाध्यक्ष चंद्रकांत जाधव, ग्रामपंचायत माजी सदस्य अरुण पवार, दत्तात्रय जाधव ,जयराम जाधव, संजय पवार, बाजीराव निंबाळकर, भाऊ डॉक्टर, हनुमंत जाधव, लक्ष्मण ढेंबरे, ग्रामपंचायत सदस्य भीमराव मोरे, शिवाजी वसंतराव जाधव, शिवाजी वाघमारे, बंडू कांबळे, सुदाम धाईंजे तसेच सोसायटीचे आजी माजी संचालक या कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित होते.



## दत्तनगर खंडाळी येथे जिजाऊ जयंती उत्साहात साजरी

**वेळापूर** : दत्तनगर खंडाळी ता. माळशिरस येथे छत्रपती संभाजी महाराज ग्रुप यांच्या वतीने जिजाऊ जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रतिमेचे पूजन सैन्य दलातील अधिकारी नवनाथ पवार व स्नेहल पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी तृप्ती जगताप व मीरा वारुळे यांनी जिजाऊ जयंती निमित्त आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाला साधना थिटे,राणी जगताप, ऋतुजा इंगळे, अर्चना गायकवाड, सोनाबाई खुळे, सुप्रिया गायकवाड, विद्या जगताप, वैष्णवी सरवळे उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोमल काळे यांनी केले. सर्व उपस्थितांचे आभार छत्रपती संभाजी महाराज ग्रुप च्या वतीने मांनण्यात आले.



## माळीनगर येथे नामांतर दिन सोहळा

**माळीनगर** : १४ जानेवारी नामांतर दिन सोहळा यशवंत आंबेडकर बुद्ध विहारांमध्ये संपन्न झाला यावेळी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रतिमेचे पूजन दिपक लोंढे व कांतीलाल भाले यांनी केले .नामांतर दिनासाठी शहीद झालेल्या भीमसैनिकांना आदरांजली वाहण्यात आली या नामविस्ताराचा इतिहास थोडक्यामध्ये आपल्या भाषणात भिमराव चंदनशिवे महेंद्र लंकेश्वर व श्रीमंत माने यांनी मांडला यावेळी नामांतर दिनाच्या उत्सवानिमित्ताने अशोक लोंढे यांनी पेढे वाटले यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थाने सरपंच अभिमान जगताप होते . मनोहर शिंदे संजय तडवळकर अजित नाईकनवरे अरुण सोनवणे अमोल जगताप गणेश कांबळे महादेव दळवी देवा भोसले आदी उपस्थित होते .

## चिंचोली काटी येथून मुलाचे अपहरण

**माळीनगर** : चिंचोली काटी येथे आजोबा सोबत फिरणारा नातू गायब झाला अज्ञात व्यक्तीने त्यास पळवून नेल्याचा गुन्हा मोहोळ पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला.

प्रकाश सायवन्ना कुंचपोर (वय ५४ रा सिंहगड रोड तिरकटवाडी फाटा पुणे) हे मुलीच्या घरी नातवाला घेऊन आले. त्यांनी तेथे मुक्काम केला दुसऱ्या दिवसी दुपारी १२ च्या सुमारास चिचोली औद्योगीक वसाहती मधील हॉटेल मध्ये चहा नाष्टा करण्यासाठी गेले असता प्रकाश कुंचपोर हे पुढे गेले पाठीमागे काही अंतराव राहीलेला नातु कुणाल अनिल बंडगर (वय ११) हा लवकर ये ईल म्हणून वाट पहात बसले मात्र तो लवकर आला नाही. त्याला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने नातवाला पळवुन नेल्याची फिर्याद आजोबाने मोहोळ पोलीसात दिली.

# साखर उताऱ्यात पिछाडीवर तर गाळपात आघाडीवर

## सोलापूरने साखर उत्पादनात १ लाख कोटी क्विंटलचा ओलांडला टप्पा

**सुराज्य/सोलापूर**

यंदाच्या गळीत हंगामात सोलापूर जिल्हा ऊस गाळप आणि साखर उत्पादनात राज्यात आघाडीवर असून कोल्हापूर जिल्हा दुसऱ्या स्थानावर आहे. तर सोलापूर जिल्ह्याने साखर उत्पादनाचा १ कोटी क्विंटल चा टप्पा ओलांडला असला तरी साखर उताऱ्यात मात्र अत्यंत पिछाडीवर आहे.तर साखर उताऱ्यात कोल्हापूर जिल्हा पहिल्या क्रमांकावर आहे.

चालू गळीत हंगामात राज्यात १०१ सहकारी व ९७ खाजगी अश्या एकूण १९८ कारखान्यांनी गळीत हंगाम सुरू केला आहे.९ जानेवारी पर्यंत सोलापूर विभागातील ४७ कारखान्यांनी १४४.१६ लाख टन ऊसाचे गाळप करून १२३.३७ लाख क्विंटल साखर उत्पादित केली असून साखर उतारा सरासरी ८.५६ टक्के इतका कमी आहे.

तर कोल्हापूर विभागातील ३४ कारखान्यांनी १४४.१६ लाख टन ऊसाचे गाळप करून १२३.३७ लाख क्विंटल साखर उत्पादन करीत सरासरी साखर उतारा १०.९५ टक्के आहे.त्यामुळे कोल्हापूर जिल्हा साखर उताऱ्यात अव्वल स्थानी आहे.

> या सरासरी साखर उताऱ्याचा पुढील वर्षीच्या एफआरपीवर मोठा परिणाम होणार आहे .या घसरलेल्या टक्केवारीमुळे शेतकऱ्यांचे अर्थकारणावर ही कोलमडणार आहे.
>
> **–बालाजी चव्हाण**
> **उस उत्पादक शेतकरी माढा**

राज्यातील १९८ कारखान्यांनी ५७९.७० लाख क्विंटल ऊसाचे गाळप करून ५६०.१७ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन केले आहे. तर राज्याचा सरासरी साखर उतारा ९.४९ टक्के इतका आहे. गतवर्षीच्या तुलनेत राज्यात २० लाख टनांनी ऊस गाळप जादा झाले असून साखर उताऱ्यात मात्र काहींशी घट झाली आहे. गतवर्षी याच दरम्यान ९.८२ टक्के इतका साखर उतारा होता.त्यातुलनेत यंदा साखर उतारा कमी झाला आहे.

**गाळप हंगाम 2022-23 मधील दिनांक 09/01/2023 अखेरचा ऊस गाळप अहवाल**

| अ. क्र. | विभाग | हंगाम सुरु झालेले कारखाने | | | दै.गाळप क्षमता (मे.टन) | एकूण ऊस गाळप, साखर उत्पादन व साखर उतारा | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सहकारी | खाजगी | एकूण | | ऊस गाळप (लाख मे.टन) | साखर उत्पादन (लाख क्विटल) | साखर उतारा (%) |
| 1 | कोल्हापूर | 25 | 9 | 34 | 202200 | 134.2 | 146.99 | 10.95 |
| 2 | पुणे | 18 | 13 | 31 | 174300 | 122.59 | 116.28 | 9.49 |
| 3 | सोलापूर | 17 | 30 | 47 | 191350 | 144.16 | 123.37 | 8.56 |
| 4 | अहमदनगर | 17 | 9 | 26 | 106500 | 73.29 | 66.99 | 9.14 |
| 5 | औरंगाबाद | 15 | 10 | 25 | 87150 | 49 | 42.91 | 8.76 |
| 6 | नांदेड | 9 | 20 | 29 | 84900 | 49.9 | 47.74 | 9.57 |
| 7 | अमरावती | 0 | 2 | 2 | 5000 | 4.26 | 4.02 | 9.44 |
| 8 | नागपूर | 0 | 4 | 4 | 8750 | 2.3 | 1.87 | 8.13 |
| एकूण | | 101 | 97 | 198 | 860150 | 579.7 | 550.17 | 9.49 |
| मागील हंगामाचा तुलनात्मक अहवाल | | 96 | 95 | 191 | 839150 | 549.89 | 540.04 | 9.82 |

जिल्ह्यात सर्वाधिक ऊस गाळप झाले असले तरी, मात्र साखर उताऱ्यात पिछाडीवर का राहिला आहे. ? याचाही विचार झाला पाहिजे. ऊस उत्पादक पुर्ण वाढलेला ऊस गळीतास पाठवितात आणि शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन ब्रिक्स मशीनद्वारे साखर उतारा चेक केला असता १० टक्केच्या पुढेच उतारा मिळतो.मग कारखान्यांमध्ये मिळणाऱ्या आणि प्रत्यक्ष शेतात मिळणाऱ्या साखर उताऱ्यातील तफावतीकडे आयुक्त कार्यालयाने लक्ष दिले पाहिजे.कोल्हापूर जिल्ह्यात १० टक्के पेक्षा जास्तीचा उतारा आणि सोलापूरमध्ये साडे आठ टक्के कमी दाखवला जात असल्याची गंभीर बाब आहे.



## श्रमसंस्कार शिबीरातून युवकांचे उज्वल भविष्य घडते; जयसिंह मोहिते-पाटील

**सुराज्य/अकलूज**

श्रमसंस्कार शिबीरातून युवकांच्या व्यक्तीमत्वाचा विकास होतो.आज सर्वांना हक्काची जाणीव आहे पण कर्तव्याची जाणीव नाही.आज सर्व शिबीरार्थींचा आत्मविश्वास वाढलेला आहे व कर्तव्याची जाणीवही झालेली आहे.अशा शिबिरातून युवकांचे उज्वल भविष्य घडते अशा शिबीरांची देशाला गरज आहे असे मत सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील कारखान्याचे अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील यांनी व्यक्त केले.

मौजे चाकोरे येथे शंकरराव मोहिते महाविद्यालयाच्या विशेष श्रमसंस्कार शिबीराच्या समारोप प्रसंगी कार्यक्रमात ते बोलत होते या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे होते.

अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे युवकांचा ध्यास ग्राम-शहर विकासविशेष श्रमसंस्कार सात दिवसांचे शिबीर मौजे चाकोरे येथे संपन्न झाले.या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी गावात ग्रामस्वच्छता,वृक्षारोपण व वृक्षदिंडी,श्रमदानातून वनराई बंधारा बांधणे,चक्रेश्वर मंदिर,विठोबा पाटील,जि.प.शाळा,निरा नदी घाट परिसरात स्वच्छता व श्रमदान केले.या दरम्यान महिला मेळावा,संमोहनशास्त्र, जादूचे प्रयोग,भारुड,सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाले.या कालावधीत डॉ.विश्वनाथ आवड,डॉ.लक्ष्मण आसबे,प्रा.धनंजय देशमुख,जितेंद्र बाजारे, सुमित भोसले यांची वैचारिक व्याख्याने संपन्न झाली.

यावेळी व्यासपीठावर चक्रेश्वर माध्यमिक विद्यालयाचे सभापती किसन भिताडे, शिवामृतचे संचालक हनुमंत शिंदे,युवानेते राहुल वाघमोडे,सहकार महर्षी सहकारी साखर कारखाना शंकरनगरचे संचालक लक्ष्मण शिंदे,सरपंच नवनाथ जाधव,उपसरपंच सचिन कचरे,चंद्रकांत शिंदे,सागर वरकड,डॉ.चंकेश्वर लोंढे,डॉ.बाळासाहेब मुळीक आदी उपस्थित होते.

यावेळी हितेश पुंज,स्नेहा मगर,किरण भांगे यांनी आपल्या मनोगतातून शिबीरातील आपले अनुभव व्यक्त केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ.दत्तात्रय मगर यांनी केले,तर सूत्रसंचालन डॉ.विजयकुमार शिंदे यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा.बलभीम काकुळे यांनी मानले. हे श्रमसंस्कार शिबीर यशस्वी करण्यासाठी कार्यक्रम अधिकारी डॉ.सज्जन पवार,डॉ.सविता सातपुते यांनी परिश्रम घेतले.

## जमिनीबाबत बनावट कुलमुख्यातार पत्र तयार करून फसवणूक

**सोलापूर** : जमिनीबाबत दिशाभूल करून बनावट स्वरूपाचे कुलमुख्यातार पत्र बोगस व बेकायदेशीरपणे तयार करून फसवणूक केल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याप्रकरणी रतनमाला बालाजीप्रसाद दुबे (वय-७०, रा. बालाजी नगर, मजरेवाडी) यांनी सदर बाजार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून आसिफ इमामसाब नदाफ (वय-४८,रा.न्यु पाच्छा पेठ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी यांची जागा ही खाजगी मालमत्ता असून,त्याचे मूळ मालक फिर्यादी हे आहेत.त्यांनी स्वतःची जमीन ही केव्हाही व कधीही विकलेली नाही.तसेच जमिनीचा कब्जा कोणालाही दिलेला नसून,फिर्यादी हे स्वतःच त्या जमिनीचे मूळ मालक आहेत.मात्र आसिफ नदाफ यांनी जमिनी बाबत काही खोटे व दिशाभूल करणारे बनावट स्वरूपाचे कुलमुख्यात पत्र बोगस व बेकायदेशीर तयार केले आहे. असे फिर्यादीत नमूद आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक धायतोंडे हे करीत आहेत.



## सहकार महर्षी जयंतीनिमित्त रक्तदान

**सुराज्य/अकलूज**

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या जयंतीनिमित्त प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिरात आयोजन करण्यात आले होते.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील ब्लड बँक येथे रक्तदान शिबिराचा प्रारंभ प्रताप क्रीडा मंडळाच्या अध्यक्षा कु. स्वरूपाराणी मोहिते पाटील यांच्या हस्ते झाला. यावेळी ब्लड बँकेचे डॉ. बाहुबली दोशी, उपाध्यक्ष प्रताप पाटील, सचिव पोपटराव भोसले पाटील, शिबिर प्रमुख प्रा. राहुल सुर्वे, संचालक वसंतराव जाधव, यशवंत माने देशमुख, बिभीषण जाधव, विश्वनाथ आवड, नंदकुमार गायकवाड, रामभाऊ गायकवाड, उत्कर्ष शेटे, सतीश यादव विजय कोळी, युवराज मालुसरे, रमजान शेख, फिरोज तांबोळी, सुहास थोरात यांच्यासह मंडळाचे सदस्य व मान्यवर उपस्थित होते.प्रा. राहुल सुर्वे म्हणाले,प्रताप क्रीडा मंडळ, सन १९८५ पासून दरवर्षी सहकार महर्षींच्या जयंती निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करते.

मंडळाचे मार्गदर्शक जयसिंह मोहिते पाटील व अध्यक्षा कु. स्वरूपाराणी मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाने कला, क्रीडा, सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. मंडळाच्या रक्तदान शिबिरामुळे परिसरातील अनेकांचे प्राण वाचले असून कोरोना काळात अनेक रुग्णांना मोलाचे सहकार्य लाभले आहे. रक्तदान शिबिरात शिक्षण प्रसारक मंडळाच्या एनसीसी, एनएसएस विद्यार्थ्यांचाही सहभाग होता. आभार सचिव पोपटराव भोसले पाटील यांनी मानले.

## घराचे कुलूप तोडून साहित्य लंपास

**सुराज्य/सोलापूर**

अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून रक्कमसह संसार उपयोगी साहित्य चोरून नेल्याची घटना दि.१३ ते १४ जानेवारी दरम्यान निरामय हॉस्पिटलच्या समोर नळ बाजार चौक लष्कर येथे घडली.

याप्रकरणी मुकुंद दशरथसिंह परदेशी (वय-५३,रा.निरामय हॉस्पिटल समोर,नळ बाजार चौक) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.


फिर्यादी यांच्या राहत्या घराच्या पाठीमागील गॅलरीमधून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश केला.त्यानंतर घरातील बेडरूमचे तसेच स्वयंपाक घराच्या दरवाजाला लावलेले कुलूप तोडले. बेडरूम व स्वयंपाक खोलीतील संसार उपयोगी साहित्य व रोख रक्कम असा एकूण १४ हजार ३०० रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे.असे फिर्यादीत नमूद आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल नदाफ करीत आहेत.

## नामांतराचा विजयोत्सवावेळी शहिदांचे स्मरण गरजेचे : ढवळे

**सुराज्य/मोहोळ**

नामांतराचा विजयोत्सव साजरा करताना त्यासाठी शहीद झालेल्याची आठवण स्मारणात असणे महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन पँथर नेते कुमार ढवळे यांनी केले.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया युवक आघाडीच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा विज्योउत्सव साजरा करण्यात आला या क्रार्यक्रमात कुमार ढवळे हे बोलत होते.



यावेळी कुमार ढवळे यांचा सत्कार रिपाईचे जिल्हा कोषाध्यक्ष विठ्ठल क्षिरसागर व युवक आघाडीचे तालुका अध्यक्ष मार्तंड काळे या दोघांच्या हस्ते शाल श्रीफळ फेटा बांधून पुष्पहार देऊन करण्यात आला यावेळी फटाक्याची आतषबाजीही करण्यात आली.

यावेळी पँथर नेते कुमार ढवळे यांनी नामांतराच्या लढ्यातील आठवणी सांगितल्या त्या काळातील नेते मंडळींना मोर्चे घेराव कसे घालण्यात आले.

यावेळी पोपट कापूरे अमोल जगताप केदार कांबळे साजन जगताप शिरिष ढवळे सुनिल जवंजाळ आबासाहेब कुचेकर आदीसह पदाधीकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# कुर्डुवाडी रेल्वे स्थानकावर सुविधांचा अभाव

**सुराज्य/कुर्डुवाडी**

कुर्डूवाडी रेल्वे जंक्शन स्टेशनवर आरक्षण तिकीट कार्यालयाच्या आवारात रेल्वे गाड्यांचे नंबर व वेळापत्रकाचे फलक गेल्या दोन महिन्यापासून नसल्यामुळे प्रवाशांना आरक्षण तिकीट काढताना अडचणी निर्माण होत आहेत.नवीन जिन्यावर माहिती फलक लावण्यात आले नाहीत. प्रवासाच्या सुविधा कडे दुर्लक्ष केले जात आहे. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना तोंडी माहिती दिल्यानंतर टाळाटाळ करीत आहेत. याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कुर्डूवाडी स्थानकाच्या सुविधाकडे लक्ष देण्याची मागणी प्रवाशातून होत आहे.

कुर्डूवाडी रेल्वे जंक्शन असल्यामुळे आरक्षण व जनरल तिकिट काढण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. आरक्षण तिकिट आवाराच्या परिसरात रेल्वे गाड्यांचे नंबर, वेळ व एक्सप्रेसचे नाव असे मोठे फलक लावण्यात आला होते. मात्र नव्याने रेल्वे गाड्यांचे वेळापत्रकामध्ये बदल झाल्याचे सांगत माहिती फलक काढून ठेवण्यात आले आहे. गेल्या दोन महिन्यापासून माहिती फलक लावण्यात आले नसल्यामुळे आरक्षण तिकिट काढण्यासाठी नागरिकांना गाडी नंबर लिहिण्यासाठी अडचणी निर्माण होत. याठिकाणी रेल्वे आरक्षण खिडकीवरील कर्मचाऱ्यांना विचारणा केल्यानंतर माहिती देण्यासाठी टाळाटाळ करीत आहेत. यामुळे आरक्षण काढताना अनेक चुका होत असल्याचे दिसत आहे. कुर्डूवाडी कुर्डवाडी स्थानकावर वरिष्ठ अधिकारी तपासणीसाठी येणार असल्याची माहिती मिळताच स्थानकावर नागरिकांच्या प्रवाशांच्या सर्व सुविधा. उपलब्ध असतात व सर्व स्थानकावर माहिती फलक स्वच्छता दिसून येते. यासाठी वरिष्ठांची तपासणी दरवर्षी व्हावी अशी प्रवाशातून मागणी होत आहे.



कुर्डूवाडी रेल्वे स्थानकावर नव्याने जिना सुरू करण्यात आला आहे. मात्र कोणत्या फलटावरती उतरण्यासाठी फलक लावण्यात आले नसल्यामुळे नागरिक अनेक वेळा दुसऱ्या ठिकाणी उतरतात. यामुळे या ठिकाणीही माहिती फलक लावावे अशी मागणी होत आहे.

# नेपाळमध्ये विमान कोसळून ६८ प्रवाशांचा मृत्यू

✔ सुराज्य/नवी दिल्ली

**नेपाळमध्ये मोठी विमान दुर्घटना घडली आहे. काठमांडूहून पोखराला जाणारे येति एअरलाइन्सचे विमान कोसळले. या विमानात ६८ प्रवासी होते. त्यातील ६८ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. काठमांडूहून पोखराला जाणारे येति एअरलाइन्सचे विमान क्रॅश झाल्याची माहिती नेपाळी माध्यमांकडून मिळाली आहे. विमानात ६८ प्रवासी आणि ४ क्रू मेंबर्स होते.**

## मृतांमध्ये पाच भारतीय

काठमांडूहून पोखराला उड्डाण करणारे येति एअरलाइन्सचे एटीआर ७२ विमान रविवारी सकाळी कास्की जिल्ह्यातील पोखरा येथे कोसळले. विमानात एकूण ६८ प्रवासी आणि चार क्रू मेंबर्स होते. येति एअरलाइन्सचे प्रवक्ते सुदर्शन बर्तौला यांनी मीडियाला सांगितले की, जुने विमानतळ आणि पोखरा आंतरराष्ट्रीय विमानतळादरम्यान कोसळलेल्या विमानात एकूण ६८ प्रवासी आणि चार क्रू मेंबर्स होते. अपघाताबाबत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनीही दुःख व्यक्त केलंय. नेपाळमधील पोखरा येथे यती एअरलाइन्सचे विमान कोसळले असून ७२ प्रवासी घेऊन निघालेल्या या विमानात भारतीय नागरिक सुद्धा असल्याची माहिती प्राप्त झाली. सदर दुर्घटना अत्यंत दुःखदायी आहे. या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या भारतीय तसेच इतर नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली, असं ट्विट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं आहे.



सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट केलेल्या छायाचित्रे आणि व्हिडिओमध्ये अपघातस्थळावरून धुराचे लोट उठताना दिसत आहेत. या विमान अपघाताबाबत अजून माहिती मिळालेली नाही. अपघातस्थळी हेलिकॉप्टरसह बचाव पथक तैनात करण्यात आले आहे.

विमानात ५३ नेपाळी, ५ भारतीय, ४ रशियन, एक आयरिश, २ कोरियन, १ अर्जेंटिनी आणि एक फ्रेंच नागरिक होते. भारताचे नागरी उड्डाणमंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी नेपाळमधील विमान अपघातातील लोकांचा मृत्यू अत्यंत दुर्दैवी असल्याचे म्हटले आहे. सिंधिया म्हणाले की, 'माझ्या संवेदना आणि प्रार्थना शोकग्रस्त कुटुंबांसोबत आहेत. येति एअरलाइन्सचे हे विमान मध्य नेपाळमधील पोखराच्या जुन्या आणि नवीन विमानतळादरम्यान कोसळल्याचे सांगण्यात येत आहे. अपघातग्रस्त विमानाच्या अवशेषाला आग लागली असून, बचाव कर्मचारी आग विझवण्याचा प्रयत्न करीत असल्याचे स्थानिक अधिकाऱ्यांनी माध्यमांना सांगितले. सर्व बचाव यंत्रणा आग विझवणे आणि प्रवाशांना वाचवणे यावर भर देत आहे.

### खराब हवामानामुळे नव्हे तर तांत्रिक बिघाडामुळे अपघात

नेपाळच्या विमानतळ प्राधिकरणाने दावा केला आहे की, येति एअरलाइन्सचे विमान खराब हवामानामुळे नव्हे तर तांत्रिक बिघाडामुळे कोसळले. पायलटने एटीसीकडून लँडिंगची परवानगी घेतल्याचे सांगण्यात आले. पोखरा ATC मधून उतरण्यासाठी ओकेसुद्धा सांगण्यात आले. नागरी उड्डाण प्राधिकरणाचे म्हणणे आहे की, 'लँडिंगच्या काही वेळापूर्वी विमानात ज्वाळा दिसत होत्या. त्यामुळे खराब हवामानामुळे हा अपघात झाला, असे म्हणता येणार नाही.'

### पोखरा विमानतळावरून सर्व उड्डाणे रद्द

पोखरा येथे रविवारी येति एअरलाईन्सचे विमान कोसळल्यानंतर पोखरा आंतरराष्ट्रीय विमानतळावरील सर्व उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. त्रिभुवन आंतरराष्ट्रीय विमानतळाचे प्रवक्ते टेकनाथ सितौला यांनी सांगितले की, 'पोखरा विमानतळावरील सर्व उड्डाणे आजसाठी रद्द करण्यात आली आहेत.'

## आयटी क्षेत्रातील तरुणांसाठी असंख्य संधी : कृष्णमूर्ती

✔ **सुराज्य/सोलापूर** : 'सोलापूरमध्ये आम्ही आमचे कार्यालय उघडल्याने येथील आयटी क्षेत्रातील तरुणांसाठी असंख्य संधी निर्माण होतील आणि त्यांना घराजवळ राहून काम करण्यास उपलब्ध होऊ शकेल, असे महेश कृष्णमूर्ती म्हणाले.'

कोअर इंटेग्रामद्वारे निर्मित 'कंट्रोल एफ' या कामगार कायद्याशी संबंधित इत्यंभूत सेवा पुरविणारा भारताच्या अग्रगण्य लेबर लॉ कम्प्लायन्स प्लॅटफॉर्मने महाराष्ट्रातील, सोलापूर इथल्या जेआर इन्नाइट आयटी पार्कमध्ये आपले आयटी डेव्हलपमेंट सेंटर उभारल्याची घोषणा रविवारी केली. यामुळे ही कंपनी द्वितीय श्रेणी शहरांमध्ये आपले आयटी डेव्हलपमेंटसाठीचे स्वतंत्र केंद्र उभारणारी पहिली रेगटेक फर्म ठरली आहे. कंपनीच्या मते ही शहरे म्हणजे उद्याची टॅलेन्ट सेंटर्स आहेत. हे नवीन कार्यालय कंपनीला अधिक चपळतेने काम करणारे विकास आराखडे आणि त्यांच्या अंमलबजावणीसाठीच्या लवचिक कार्यपद्धतीच्या कंपनीच्या धोरणाला मदत करेल.

## जिजाऊंची यशोगाथा मांडण्यास अभिनेत्री ईश्वरी देशपांडे सज्ज

✔ **सुराज्य/सोलापूर** : 'मुजरा माझा त्या माँ जिजाऊला, घडविले तिने त्या शूर शिवबाला!!' छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री जिजाबाई. स्वराज्याचा रक्षक ज्यांनी जन्माला घातला, त्याच्या अंगी स्वराज्य रक्षणाचे बाळकडू पाजून त्यांना सक्षम करण्यात राजमाता जिजाऊंचे अतुल्य योगदान हा महाराष्ट्र कधीही विसरणार नाही. स्त्री अबला नसून सबला आहे असे दाखवून देणाऱ्या या व्यक्तिमत्त्वावर चित्रपट नसता आला तरच नवल. नेमकी हीच बाब हेरत '६ फायरफ्लाईज प्रॉडक्शन्स' प्रस्तुत अनुजा देशपांडे निर्मित आणि प्रितम एस. के. पाटील लिखित-दिग्दर्शित 'स्वराज्य कनिका -जिऊ' हा मराठी चित्रपट लवकरच सज्ज होणार आहे. जिजाबाईंच्या ४२५व्या जयंतीचे औचित्य साधत 'स्वराज्य कनिका-जिऊ' चित्रपटाचे दुसरे पोस्टर प्रेक्षकांच्या भेटीस आले असून नवोदित अभिनेत्री ईश्वरी देशपांडे या चित्रपटात जिजाऊंच्या भूमिकेत पाहायला मिळतेय.

## 'पिकोलो' चित्रपटाचा ट्रेलर प्रकाशित

✔ **सुराज्य/पुणे** : 'पिकोलो' हा चित्रपट २६ जानेवारीला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. तत्पूर्वी या चित्रपटाचा शानदार ट्रेलर मनसे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांच्या हस्ते नुकताच प्रकाशित करण्यात आला. राजसाहेबांनी चित्रपटाला मनापासून शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी चित्रपटाचे दिग्दर्शक अभिजीत मोहन वारंग तसेच मध्यवर्ती भूमिकेतले कलाकार प्रणव रावराणे आणि अश्विनी कासार उपस्थित होते. फोर्टिंगो मोशन पिक्चर प्रा. लि प्रस्तुत आणि अभिजीत मोहन वारंग दिग्दर्शित 'पिकोलो' ह संगीतमय चित्रपट असून राजेश मुद्दापूर यांनी निर्मिती केली आहे.

## पंकजा मुंडे भाजपवर नाराज

✔ **सुराज्य/मुंबई** : भाजप नेत्या आणि माजी मंत्री पंकजा मुंडे गेल्या काही दिवसांपासून भाजपवर नाराज असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा सुरु आहे. अशात त्यांना शिवसेनेच्या ठाकरे गटाने त्यांना पक्षात येण्याची ऑफर दिली आहे. त्यामुळे आता पंकजा मुंडे ठाकरे गटात जाणार की नाही यावरही चर्चा रंगतायत. यावर पंकजा मुंडेंनीही मौन बाळगल्याने शिंदे गट, ठाकरे गट आणि भाजपमध्ये उलट सुलट चर्चा सुरु आहे. संत वामन भाऊंच्या ४७व्या पुण्यतिथी निमित्त आयोजित या सोहळ्यानिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गहिणीनाथ गडावर येणार आहेत. तसेच पंकजा मुंडेही याठिकाणी हजेरी लावणार होत्या.

## उद्योजकांना त्रास देणाऱ्यांचे कंबरडे मोडा : फडणवीस

✔ सुराज्य/पुणे

**पुण्यासह राज्यात अनेक उद्योजक आपली गुंतवणूक करण्यास उत्सुक आहेत. मात्र, काही बनावट माथाडी कामगारांचे नेते तयार झाले असून ते उद्योजकांना कंत्राटांसाठी त्रास देतात, अशा लोकांचे कंबरडे मोडा, असे स्पष्ट आदेश पोलिसांना दिले आहेत, असे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी पुण्यात सांगितले.**



पाषाण रस्त्यावरील पोलीस संशोधन केंद्रात शनिवारी वार्षिक गुन्हेगारी आढावा बैठकीत उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी पोलिसांना हे आदेश दिले. याचा उल्लेख त्यांनी शहराच्या विविध विकासकामांच्या उद्घाटन कार्यक्रमात बोलताना केला. वर्षभरापूर्वी एक उद्योजक राज्यात सहा हजार कोटींची गुंतवणूक घेऊन येणार होता. मात्र, राज्यातील एका मंत्र्याच्या माध्यमातून कंत्राटांसाठी त्या उद्योजकाला धमकावण्यात आले. राज्यातील महाविकास आघाडी सरकारच्या काळातील एकूणच वातावरण पाहून संबंधित उद्योजकाने त्याची सहा हजार कोटींची गुंतवणूक महाराष्ट्रात करण्यास नकार देऊन कर्नाटकला जाणे पसंत केले. त्यामुळे उद्योजकांना त्रास देणाऱ्यांवर पोलिसांनी कारवाई करावी. त्याकरिता त्रास देणारा कोणत्याही पक्षाचा, गटाचा, धर्माचा किंवा जातीचा असो, त्याची गय केली जाणार नाही. पोलिसांनी संबंधितांवर कारवाई न केल्यास पोलिसांवर कारवाई केली जाईल, असा इशाराही फडणवीस यांनी यावेळी दिला.

### उद्योगात राजकारण आणू नका

उद्योगांना पोषक वातावरण तयार करणे राज्य सरकारची जबाबदारी असते. मुंबईनंतर पुणे राज्याचे दुसरे विकास केंद्र तयार करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे. उद्योगस्नेही वातावरण तयार करण्यासाठी उद्योगांबाबत राजकारण आणता कामा नये, असे आवाहनही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले.

## बांधकाम व्यावसायिकाच्या विरोधात मोफा

### सदनिका खरेदी व्यवहारात नऊ कोटींची फसवणूक



✔ **सुराज्य/पुणे** : सदनिका खरेदी व्यवहारात ग्राहकाची नऊ कोटी ११ लाख रुपयांची फसवणूक केल्या प्रकरणी एका बांधकाम व्यावसायिकाच्या विरोधात महाराष्ट्र सदनिका मालकी हक्क (मोफा) कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी निर्माण प्रायव्हेट लिमिटेड या बांधकाम कंपनीचे संचालक निलेश प्रभाकर कामठे, दीपमाला गणेश काळे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत परमजितसिंग अरोरा (वय ५४, रा. कल्याणीनगर, येरवडा)यांनी कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. बांधकाम व्यावसायिक काठे, काळे यांच्या गृहप्रकल्पात अरोरा यांनी सदनिका खरेदी केल्या होता. सदनिका खरेदी व्यवहारात अरोरा यांनी त्यांना नऊ कोटी ११ लाख रुपये दिले होते. त्यानंतर गृहप्रकल्पाचे काम पूर्ण न करता अरोरा यांना सदनिकेचा ताबा देण्यात आला नाही. याबाबत अरोरा यांनी आर्थिक गुन्हे शाखेत तक्रार दिली. तक्रारीची पडताळणी करुन गुन्हा दाखल करण्यात आला असून सहायक पोलीस निरीक्षक खंडागळे तपास करत आहेत.

## खा. सुप्रिया सुळे यांच्या साडीने घेतला पेट



✔ **सुराज्य/पुणे** : पुण्यातील एका कार्यक्रमाचे उद्घाटन करताना राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या साडीने अचाकनपणे पेट घेतल्याची घटना घडली. सुदैवाने या दुर्घटनेत सुप्रिया सुळे यांना कोणतीही इजा झालेली नाही. साडीला आग लागल्याचे लक्षात येताच त्यांनी ती विझवली. सुप्रिया सुळे पुणे दौऱ्यावर आहेत. बारामती लोकसभा मतदारसंघातील हिंजवडी येथे आयोजित करण्यात आलेल्या कराटे स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात सुप्रिया सुळे उपस्थित होत्या. यावेळी दीपप्रज्वलन करताना सुळे यांच्या साडीने पेट घेतला. मात्र ही बाब वेळीच लक्षात आल्यामुळे पुढील अनर्थ टळला. सुप्रिया सुळे यांनी बाजूला होत लगेच साडीला लागलेली आग विझवली.

## गडकरींना धमकी देणारा निघाला कुख्यात गुंड

✔ सुराज्य/मुंबई

भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या कार्यालयात १०० कोटी रुपयांची खंडणी मागणारा फोन कॉल आल्यामुळे एकच खळबळ उडाली होती. १०० कोटी रुपये न दिल्यास बॉम्बस्फोट घडवून आणू, अशीही धमकी या फोनकॉलद्वारे देण्यात आली होती.

दरम्यान, ही धमकी कर्नाटकमधील एका तुरुंगातून देण्यात आल्याचे समोर आले आहे. धमकी देणाऱ्या तुरुंगातील व्यक्तीचे नाव जयेश कांता असे आहे.

याबाबत नागपूर पोलिसांनी अधिक माहिती दिली आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना तरुंगातून धमकी देण्यात आली होती. धमकी देणाऱ्या आरोपीचे नाव जयेश कांता असे आहे. हा आरोपी कुख्यात गुंड असून त्याच्यावर खुनाचा आरोप आहे, अशी माहिती नागपूरचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली.

## भारतीय वंशाचे रो खन्ना अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या स्पर्धेत

✔ सुराज्य/वॉशिंग्टन



अमेरिकी काँग्रेसचे भारतीय वंशाचे सदस्य रो (रोहन) खन्ना हे कॅलिफोर्नियातून सेनेटवर निवडून जाण्यासाठी प्रयत्नरत असल्याची माहिती खन्ना यांनी दिली आहे. खन्ना यांचा हेतू भविष्यात राष्ट्राध्यक्ष पदाची निवडणूक लढविण्याचा आहे, अशी चर्चा वेगवेगळ्या राज्यांतील डेमोक्रॅट सदस्यांमध्ये आहे.

४६ वर्षीय खन्ना यांच्या निकटवर्तीयांनी सांगितले की, '२०२८ मधील किंवा त्यानंतरची अध्यक्षीय निवडणूक लढण्याचा पर्याय खन्ना यांच्यासाठी खुला आहे. पण त्यांच्या नजीकच्या काही लोकांच्या मतानुसार, जर विद्यमान अध्यक्ष जो बायडेन (वय ८० वर्षे) ही निवडणूक लढण्यास उत्सुक नसतील, तर २०२४ मध्येच खन्ना स्पर्धेत असतील. 'पॉलिटिको' या वृत्तपत्राने ही बातमी दिली आहे.

## २६ जानेवारीचा दहशतवादी हल्ल्याचा कट उधळला; आयएसआयच्या दोन अतिरेक्यांना अटक

✔ **सुराज्य/नवी दिल्ली** : प्रजासत्ताक दिनापूर्वी (२६जानेवारी) मोठा दहशतवादी हल्ला करण्याचा कट आयएसआय अतिरेकी संघटनेकडून आखण्यात आला होता, मात्र दिल्ली पोलिसांनी दहशतवादी हल्ल्याचा हा कट उधळून लावला आहे. दिल्ली पोलिसांनी याप्रकरणी दोन अतिरेक्यांना अटक केली आहे. हे दोघेही आयएसआयसाठी काम करत असल्याचे माहिती चौकशीतून समोर आली आहे. दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलच्या या कामगिरीमुळे प्रजासत्ताक दिनापूर्वी देशात दहशतवादी हल्ल्याचा मोठा कट हाणून पाडता आला.

जहांगीरपुरी येथून अटक केलेल्या संशयितांची दिल्ली पोलिसांनी चौकशी केल्यानंतर समोर आले की, हे दोघांचे हरकत उल अन्सार आणि खलिस्तान टायगर फोर्सशी संबंध आहेत. तसेच दोघेही दहशतवादी गट पाकिस्तानची गुप्तचर यंत्रणा आयएसआयच्या मार्गदर्शनाखाली तयार झाले आहेत. यांचा उद्देश भारतात दहशत निर्माण करणं आहे, असंही दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने सांगितलं.


अटक केलेल्या संशयित दहशतवाद्यांकडून हातबॉम्ब जप्त करण्यात आला आहे. दिल्ली पोलिसांनी भालस्व डेअरीवर छापेमारी केली त्यावेळी या दोन संशयित दहशतवाद्यांना अटक केली. दोघांची चौकशीतून एका हत्याचा उलघडा झाला आहे.

## ससूनच्या अधिष्ठातापदी डॉ. संजीव ठाकूर



✔ **सुराज्य/पुणे** : राज्यातील अनेक गरजू रुग्णांना अद्ययावत उपचार देणारे प्रमुख सरकारी रुग्णालय असा लौकिक असलेल्या ससून सर्वोपचार रुग्णालय आणि बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठातापदी डॉ. संजीव ठाकूर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अधिष्ठाता पदाची जबाबदारी सांभाळत असलेले डॉ. विनायक काळे यांच्याकडे रुग्णालयातील मानसिक आरोग्य संस्थेच्या संचालकपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. डॉ. संजीव ठाकूर हे आतापर्यंत सोलापूर येथील डॉ. वैशंपायन स्मृती शासकिय वैद्यकीय महाविद्यालय येथे अधिष्ठाता म्हणून कार्यरत होते. तेथील पदभार डॉ. सुधीर देशमुख यांच्याकडे सोपवून बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय आणि ससून रुग्णालयाचा पदभार स्वीकारण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## '...तर मी खपवून घेणार नाही' : पवार



✔ **सुराज्य/पुणे** : गेल्या काही दिवसांपासून पुणे शहरासह आसपासच्या परिसरात कोयता गँगने दहशत माजवली आहे. यावरून विधानसभा विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी थेट इशारा दिला आहे. अशा गोष्टी खपवून घेणार नाही, असा इशारा अजित पवारांनी दिला. बारामतीत प्रत्येक महिला आणि मुलींना सुरक्षित वाटलं पाहिजे. कुणीही गुंडगिरी करता कामा नये, अशा शब्दांत अजित पवारांनी इशारा दिला आहे. ते बारामती येथे एका कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी अजित पवार म्हणाले, 'शनिवारी बारामतीत काहीतरी घटना घडली, असं माझ्या कानावर आलं आहे. याच्याआधीही अशा काही घटना घडल्या आहेत. पण असे प्रकार मी खपवून घेणार नाही. बारामतीत राहणारा मूळ बारामतीकर किंवा शिक्षण, नोकरी आणि व्यावसायानिमित्त बारामतीत आलेल्या प्रत्येक नागरिकाला बारामतीत सुरक्षितच वाटलं पाहिजे. त्यामुळे कुणीही चुकीचं वागता कामा नये.'

## मुलांमध्ये वाढतोय 'टीबी'चा धोका

✔ **सुराज्य/मुंबई** : लहान मुलांमध्ये टीबीचे प्रमाण वाढत असल्याचे समोर आलं आहे. शहरात प्रत्येकी दहा टीबीच्या रुग्णांमागे एका मुलाला टीबीचा संसर्ग झाल्याचे आत्तापर्यंतच्या अहवालात दिसून आलं आहे. टीबीचे रुग्ण वाढत असले तरी अद्याप बालरोग क्षय रुग्णांसाठी समर्पित असलेले आयसीयू सुरू करण्यात आले नाहीयेत. पुढील आठवड्यात आयसीयू सुरु करणार असल्याची शक्यता आहे.

# पोलीस पत्नीसाठी मुस्लीम महिला ठरली 'देवदूत'

✔ सुराज्य/चंद्रपूर

**'हिच अमुची प्रार्थना अन् हेच अमुचे मागणे, माणसाने माणसाशी माणसासम वागणे', या प्रार्थनेला साजेसा अनुभव नुकताच चंद्रपुरात आला. येथील एका पोलीस अधिकाऱ्याच्या पत्नीसाठी मुस्लीम महिला 'देवदूत' ठरली. फातिमा पट्टावाला या बोहरा समाजाच्या महिलेने एका नऊ महिन्याच्या गरोदर महिलेला रक्तदान करून तिचा व बाळाचा जीव वाचविला. या अनोख्या रक्तदानाची सर्वत्र चर्चा सुरू आहे.**

मूळचे वर्धा येथील रहिवाशी असलेले पोलीस उपनिरीक्षक रोहन परतेकी रामनगर ठाण्यात कर्तव्यावर आहेत. त्यांची पत्नी नऊ महिन्यांची गरोदर आहे. १० जानेवारी रोजी पोलीस भरतीत व्यस्त असलेल्या परतेकी यांना प्रसुती रुग्णालयातून फोन आला. तुमच्या पत्नीला हॉस्पिटलमध्ये घेऊन या, असे त्यांना सांगण्यात आले. पोलीस भरती सुरू असल्याने परतेकी यांनी वरिष्ठांना कल्पना देत थेट हॉस्पिटल गाठले. त्यानंतर पत्नीला घेऊन धांडे हॉस्पिटलला गेले. तुमच्या पत्नीच्या शरीरात रक्ताची कमतरता आहे. त्यामुळे प्रसुतीत समस्या निर्माण होऊ शकतात. पत्नीचा रक्तगट ०+ असल्याने तुम्ही त्याची व्यवस्था करा, असे डॉक्टरांनी त्यांना सांगितले.



चंद्रपूर शहर नवीन, कुणीही नातेवाईक नाही. यामुळे परतेकी चिंतेत पडले. त्यांनी मित्र तुषार येलमे याला फोन केला आणि पत्नीला तत्काळ रक्ताची गरज असल्याचे सांगितले. त्याने १० मिनिटांत रक्ताची जुळवाजुळव केली. यानंतर परतेकी यांना सुखद अनुभव आला.

मित्राने रक्ताची व्यवस्था झाल्याचे सांगितले आणि मी लगेच रक्तपेढीत गेलो. तेथे पुरुष रक्तदात्याला शोधू लागलो. तेथे कोणी पुरुष दिसला नाही आणि माझ्यासमोर एक मुस्लीम महिला उभी ठाकली. तिला विचारले की आपण रक्त देण्यासाठी आला आहात? तिने लगेच 'हो' म्हटले आणि तुषारचे नाव सांगितले. बुरखा घातलेल्या तरुणीचा होकार ऐकून आश्चर्याचा धक्का बसला. कारण मी आतापर्यंत मुलींना सहजासहजी रक्तदान करताना बघितले नव्हते आणि ही ताई माझ्या अगोदर जाऊन रक्तदान करण्यासाठी तयार होती, असे परतेकी यांनी सांगितले.

मी तिला आणखी विचारले तर ती म्हणाली, 'माझे नाव फातिमा आहे आणि मी हकीम यांची बहीण आहे. माझे भाऊ हकीम हे गरजू लोकांना रक्तदान करण्याचे काम करतात. त्यांची चंद्रपूर शहरात रक्तदात्यांची एक साखळी आहे. हकीम भैय्यांनी मला सांगितले की, 'एका पोलीस अधिकाऱ्याच्या पत्नीला रक्ताची गरज आहे त्यासाठी तू स्वतःच जा आणि मी लगेच आले. मी विचार केला की आजकाल विविध वाहिन्यांवर फक्त हिंदू-मुस्लीम याच विषयावर चर्चा जाणीवपूर्वक घडवून आणल्या जातात. समाज माध्यमावर देखील लोक हिंदू-मुस्लीम अशी भारताची विभागणी करतात. मात्र हे चुकीचे आहे, असे ती म्हणाली.

चंद्रपूरसारख्या शहरात हकीम भैय्या आणि त्यांची भगिनी फातिमा हे कोणताही जातीय भेदभाव न करता आपले रक्त गरजू लोकांना दान करून, हिंदू मुस्लीमचे रक्त एकच आहे, असे सांगत आहेत. आमचा फक्त एकच धर्म, तो म्हणजे माणुसकी, असा संदेश हकीम भैय्या आणि त्यांची भगिनी फातिमा आपल्या प्रत्यक्ष कृतीतून देत आहेत.

